# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६ / फाल्गुन १९, १९४७ ( शके )**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री**
**(३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री**
**(४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री**
**(५) माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री**
**(६) परिवहन मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३८**

---

### धुळे जिल्हयात मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१) * २४४८५ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयात मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासनाकडुन दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्वी येथील न्यु एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती एस.एस.शेणगे परिवार हायस्कुल व चौगाव येथील व्ही.एन.पाटील माध्यमिक विद्यालय या दोन शाळांमध्ये सन २०१० ते २०२४ या कालावधीत रुपये ३ लाख ७१ हजार ७०७ इतक्या रक्कमेचा गैरव्यवहार झाल्याने संस्थेचे पदाधिकारी व मुख्याध्यापकांसह १६ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) धुळे जिल्ह्यात मागासवर्गीय विद्यार्थांसाठी शासनाकडून दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार झाला असल्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) आर्वी येथील न्यु एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती. एस.एस.शेणगे परिवार हायस्कुल व चौगाव येथील व्ही.एन.पाटील माध्यमिक विद्यालय या दोन शाळांमध्ये सन २०१० ते २०२४ या कालावधीतील रु.३,७१,७०७/- इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याबाबत सदर गुन्ह्यातील फिर्यादी उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, धुळे यांनी सहायक संचालक, (प्र) स्थानिक निधी लेखा परिक्षा, धुळे यांच्या दिनांक २४.११.२०२५ रोजीच्या चौकशी अहवालाच्या आधारे दिलेल्या तक्रारीनुसार संस्थेचे मुख्याध्यापक, पदाधिकारी आणि लिपिक अशा २२ इसमांविरुध्द दिनांक ३१.१२.२०२५ रोजी धुळे तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा क्र. गु.र.नं. ७६७/२०२५ असा असून भा.दं.सं. कलम ४२०, ४०९, ३४ प्रमाणे सदर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणाचा तपास प्राथमिक स्थितीत असून अद्यापपर्यंत झालेल्या तपासात फिर्यादीत नमूद गैरव्यवहाराची रक्कम ही शिष्यवृत्ती निधीची नसून महाविद्यालयीन "शिक्षण फी" ची आहे असे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, धुळे यांनी त्यांचे दिनांक २६.०२.२०२६ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार निष्पन्न झाले आहे.

शाळा प्रशासनाने दिलेल्या जबाबावरुन सदर शिक्षण फी ची रक्कम न्यु एज्युकेशन सोसायटी, आर्वी चे चेअरमन/अध्यक्ष श्री. विश्वास पाटील यांनी शाळेच्या पटांगणास कम्पाऊंड व गेट बांधकाम व मजुरीकरीता वापरली. तथापि, हा वापर करतांना ती रक्कम शाळा व संस्था प्रशासनाने त्यांच्या खात्यावर नियमबाहयपणे वर्ग करुन गंभीर अनियमितता केलेली आहे. असे सहायक संचालक (प्र.) स्थानिक निधी लेखापरिक्षण, धुळे यांनी त्यांच्या लेखापरिक्षण अहवालात नमूद केले आहे. त्यामुळे शासन नियमानुसार सदरची रक्कम व्याजासहीत वसुल करुन भरणा करणे अनिवार्य असल्याचे लेखापरिक्षण अहवालात नमूद असल्याने मुळ रक्कम व्याजासहीत शासनास चलनाद्वारे भरणा केली असल्याचे तपासात दिसून आले आहे.

तसेच स्थानिक निधी लेखापरिक्षा, धुळे यांनी सदर प्रकरणी अनियमितता झाली असल्याचे त्यांच्या अहवालात नमूद केले असल्याने त्याबाबत अधिकचा तपास सुरु आहे. सदरच्या गुन्ह्यातील सर्व आरोपींचे अटकपुर्व जामीन/अंतरिम जामीन मा.न्यायालयाने मंजूर केलेले आहेत. सद्यस्थितीत सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(४) विलंब नाही.

-----------------

## राज्यात सायबर फसवणूक होत असल्याबाबत

**(२) * २३३७६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.देवेंद्र कोठे (सोलापूर शहर मध्य), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ई-चलानच्या नावाने बनावट लिंक किंवा एपीके फाईल पाठवून सायबर फसवणूक केल्याच्या घटना घडल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील दौंड, हवेली, शिरूर व बारामती तालुक्यांमध्ये 'फनरेप' नावाच्या ऑनलाइन गेमच्या माध्यमातून तरुण, व्यावसायिक व नागरिकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच नंदूरबार, धुळे येथील आदिवासी बांधवांना पैशाचे अमिष दाखवून त्यांच्या नावावर मोबाईलचे सिम कार्ड घेऊन बँक खाती उघडून राज्यात, देशात व आंतराष्ट्रीय पातळीवर सुमारे २ कोटी २९ लाख इतक्या रकमेची डिजीटल फसवणूक करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच गत दोन वर्षात सोलापूर जिल्ह्यातील ३५०६ जणांची सायबर गुन्हेगारांनी सुमारे ४१ कोटींची फसवणूक केल्याची बाब निदर्शनास आली असून, डिजिटल अरेस्ट तसेच विविध अमिषातून व भीती दाखवून सायबर गुन्हेगारांनी नागरिकांची फसवणूक केल्यामुळे ७२६ जणांनी सायबर पोलिसात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर ऑनलाइन गेममुळे आर्थिक नुकसान, कर्जबाजारीपणा, मानसिक तणाव तसेच आत्महत्येचे प्रकार घडल्याबाबतच्या तक्रारी संबंधित पोलीस यंत्रणेकडे प्राप्त झाल्या आहेत तसेच महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पाच्या "कमांड अँड कंट्रोल सेंटर"ला दररोज ७००० पेक्षा जास्त कॉल प्राप्त होत असून सायबर गुन्हेगारांना पकडण्यात शासनास यश मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) तसेच राज्यात सायबर-सक्षम आर्थिक फसवणुकीच्या घटनांमधील प्रमाण व गुंतागुंत वाढली असून, त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाल्याने सायबर फसवणूक रोखण्यासाठी व फसवणुकीनंतरची रक्कम परत मिळविण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी वास्तविक वेळेतील नागरिक जनजागृती व तात्काळ प्रतिबंधात्मक निर्णय घेणे अत्यावश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(७) तसेच उक्त प्रकारच्या ऑनलाइन गेमिंगद्वारे होणाऱ्या आर्थिक फसवणुकीस प्रतिबंध घालण्यासाठी, तरुणांना या डिजिटल व्यसनापासून वाचविण्यासाठी गृह विभाग व संबंधित यंत्रणांमार्फत कोणती प्रतिबंधात्मक व जनजागृतीपर कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(८) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह नागरिकांची फसवणूक रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात ई-चलानच्या नावाखाली बनावट लिंक किंवा एपीके फाईल पाठवून सायबर फसवणूक केल्याबाबत सन २०२५ मध्ये १९३ गुन्हे दाखल असून ३६ आरोपींना अटक केले आहे.

(२) सदर बाबत पुणे शहर व पुणे ग्रामीण पोलीस घटकात गुन्हा दाखल नाही.

(३) दिनांक २८.१०.२०२५ रोजी पोलीस अधीक्षक, नंदुरबार यांच्या शासकीय ई-मेलवर Vodafone-Idea कंपनीकडून ई-मेल प्राप्त झाला. त्यामध्ये नंदुरबार जिल्ह्यातील अधिकृत सिम विक्रेते यांनी ४७२ व्यक्तींच्या नावाने सिमकार्ड सक्रिय करून त्यांचा वापर पोलीसांच्या नावाने तोतयागिरी व कायदेशीर कारवाईची धमकी देणाऱ्या फसव्या कॉलसाठी केल्याबाबत नमूद करण्यात आले होते.

सदरची माहिती प्राप्त झाल्यानंतर पोलीस तपासात Vodafone-Idea, Airtel कंपनीचे अधीकृत एजन्सी असणा-या एका व्यक्तीने इतर ४ व्यक्तींच्या मदतीने स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी नंदुरबार जिल्ह्यातील लोकांचे ओळखपत्र वापरून त्यांच्या नावाने Vodafone-Idea, Airtel कंपनीचे सिमकार्ड अॅक्टीव केले.

तनंतर उपरोक्त व्यक्तींनी वेगवेगळया लोकांचे बँक खाते उघडून त्यांचे पासबूक/एटीएम कार्ड उल्हासनगर, ठाणे येथे राहणाऱ्या एका व्यक्तीस पाठविले. सदर व्यक्तीने उपरोक्त माहितीचा वापर पोलीसांच्या नावाने तोतयागिरी करून डिजीटल अरेस्ट व मोबाईल बंद करण्याची धमकी देवून लोकांच्या फसवणूकीसाठी केला. सदर बँक खात्यांतून एकूण रु.१,४०,५७,७६९ रक्कमेचा व्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले.

त्यानुषंगाने नंदुरबार उपनगर पोलीस ठाणे येथे दिनांक १७.११.२०२५ रोजी गु.र.क्र. ३०७/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३५१(२)(३), ६१(२), २३८, ३(५) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (सी)(डी) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात १२ आरोपी निष्पन्न असून त्यापैकी ८ आरोपींना अटक करण्यात आली व ४ पाहिजे आरोपींचा शोध सुरु आहे. सद्यस्थितीत ८ अटक आरोपी न्यायालयीन कोठडीत असून त्यांच्या विरुद्ध

मा.न्यायालयात दिनांक १९.०१.२०२६ रोजी दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

सदर प्रकरणाबाबत धुळे पोलीस घटकात गुन्हा दाखल नाही.

(४) सन २०२४ व २०२५ या दोन वर्षात सोलापूर जिल्ह्यात आर्थिक सायबर गुन्ह्याबाबत ५२ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ५४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यात एकूण रु.१७,७७,७३,५७२/- किंमतीची फसवणूक झाल्याची तक्रार प्राप्त असून त्यापैकी रु.८१,१५,७६०/- इतकी रक्कम फ्रिज करण्यात आली आहे.

तसेच डिजीटल अरेस्ट संदर्भात सोलापूर जिल्ह्यात सन २०२४ व २०२५ मध्ये ७ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(५) महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पाच्या "कमांड ॲन्ड कंट्रोल सेंटर" ला दररोज सुमारे ७००० कॉल प्राप्त होत असतात.

राज्यात ऑनलाईन गेमींगमुळे सन २०२४ व २०२५ मध्ये १२० गुन्हे दाखल असून ६८ आरोपींना अटक करण्यात आले आहे.

(६), (७) व (८) राज्य शासनाने सायबर फसवणुकीला बळी पडणाऱ्या नागरिकांना विशेषत: महिला, बालके व ज्येष्ठ नागरिकांना केंद्र स्थानी ठेवून अत्याधुनिक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि संसाधनांनी युक्त अशा उपाय योजनांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प कार्यान्वीत केला आहे.

राज्यभरातील सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापे, नवी मुंबई येथे सायबर सुरक्षा प्रकल्पाचे मुख्यालय तसेच नोडल सायबर पोलीस स्टेशन कार्यरत असून त्याद्वारे राज्यातील ५० जिल्हा सायबर लॅब्स/ पोलीस ठाणे तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी कार्यरत आहे.

महाराष्ट्र सायबर कार्यालयाकडून २६ तज्ञ सल्लागारांच्या मदतीने राज्यातील १००० पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना Forensic Tools चे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले आहे.

सर्व प्रकारचे सायबर गुन्हे रोखण्याकरीता www.cybercrime.gov.in ही वेबसाईट व सायबर हेल्पलाईन नंबर १९३० बाबत सर्व सामान्य जनतेत महाराष्ट्र सायबरच्या सोशल मिडीया Twitter, Instagram, Facebook, YouTube अकांउट्सद्वारे जनजागृती करण्यात आली आहे.

तसेच राज्यातील ३४ रेल्वे स्थानकांवरून महारेल एलईडी/ एलसीडी स्क्रीनद्वारे सायबर गुन्ह्याबाबत प्रभाविपणे जनजागृती करण्यात येते.

शासनाने दिनांक ०२.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये ऑनलाईन लॉटरी व ऑनलाईन गेम्स यांचे विनियमन करण्यासाठी कायदा करण्याबाबत मा.मंत्री, गृह मंत्रालय, भारत सरकार यांना विनंती केली आली होती. त्यानुषंगाने केंद्र शासनाने "Promotion and Regulation of Online Gaming Act, २०२५" दिनांक २२.०८.२०२५ रोजी भारतीय राजपत्रात प्रसिद्ध करून लागू केला आहे.

-----------------

## शिराळा (जि.सांगली) येथील मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेपासून कृषी पंपधारक शेतकरी वंचित राहिल्याबाबत

**(३) * २८३५२ श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराळा (जि.सांगली) येथील कृषी पंपधारक शेतकऱ्यांच्या देयकावरती महावितरण कंपनीकडून चुकीच्या नोंदी केल्याने शेतकरी मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेपासून वंचित राहिल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणचे शेतकरी हे ७.५ एच.पी. कनेक्शनची मंजूरी घेवून विजेचा वापर करत असताना प्रत्यक्षात मात्र महावितरण कंपनीकडून ८, ८.५, ९ व ९.५ अशी चुकीच्या नोंदी असलेली देयके देण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाबाबत त्याठिकाणच्या शेतकऱ्यांनी महावितरण कंपनीकडे वारंवार तक्रारी करुन पाठपुरावा केला असता पोर्टल बंद असल्याचे सांगून कंपनीकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याच्या अनेक तक्रारी शेतकऱ्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, उक्त ठिकाणच्या शेतकऱ्यांना महावितरण कंपनीकडून होणारा नाहक त्रास व आर्थिक नुकसान टाळण्याकरीता पुन:श्च वस्तुनिष्ठ सर्व्हे करुन कृषी पंपधारक शेतकऱ्यांना योग्य तो न्याय मिळणेबाबत स्थनिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व उर्जा राज्यमंत्री महोदयांना दिनांक ९ जानेवारी, २०२६ रोजी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांना महावितरण कंपनीकडून होणारा नाहक त्रास व आर्थिक नुकसान टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सांगली जिल्ह्यातील शिराळा मतदार संघांतील एकूण ४७२ कृषी पंपधारक शेतकऱ्यांच्या वीज बिलावरील मंजूर जोडभार ७.५० एच.पी. पेक्षा अधिक व १० एच.पी. पर्यंत आहे. संबंधित शेतकऱ्यांनी आपल्या कृषीपंपधारक वीज जोडणीचा जोडभार कमी करणेबाबत महावितरणच्या शाखा कार्यालय तसेच उपविभागीय कार्यालयाकडे तोंडी चौकशी केली असल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, या संदर्भात या कार्यालयाकडे कोणताही ऑनलाईन अर्ज प्राप्त झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

सद्यस्थितीत शिराळा मतदारसंघांतर्गत ७.५० एच.पी. पेक्षा कमी जोडभार असणाऱ्या २३,०२७ कृषी ग्राहकांना मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेचा लाभ देण्यात येत आहे.

तसेच ७.५० एच.पी. पेक्षा अधिक व १० एच.पी. पर्यंत जोडभार असलेल्या ४७२ कृषी पंप ग्राहकांना नियमितपणे विद्युतपुरवठा करण्यात येत असून, त्यांना महावितरण कंपनीमार्फत मंजूर जोडभाराप्रमाणे वीज बिले देण्यात आलेली आहेत.

(३) हे खरे नाही.

याबाबत महावितरणच्या पोर्टलवरून सदर सेवा उपलब्ध आहे. याबाबत संबंधित शेतकऱ्यांमार्फत स्थानिक लोकप्रतिनिधींना कळविण्यात आले आहे. काही शेतकऱ्यांनी शेतीपंप वीज जोडणीचा जोडभार कमी करणेबाबत महावितरण कंपनीकडे तोंडी मागणी केली आहे परंतु कोणत्याही ग्राहकाचा ऑनलाईन अर्ज महावितरण कंपनीच्या कार्यालयास प्राप्त झालेला नाही.

(४) हे खरे आहे.

(५) शिराळा मतदार संघातील ५२ ग्राहकांची तोंडी स्वरुपात शंका व तक्रारी प्राप्त झाल्यामुळे वस्तुस्थिती स्पष्ट करण्याच्या उद्देशाने आणि उपलब्ध अभिलेख नोंदीतील माहिती व प्रत्यक्ष परिस्थिती यामध्ये कोणताही फरक नाही याची खातरजमा करण्यासाठी प्रशासनिक दक्षतेचा भाग म्हणून निवडक स्वरूपात ५२ वीज जोडण्यांची स्थळ तपासणी केली असता, देयकावरील विद्युत भार व प्रत्यक्ष मोजणी केलेला विद्युत भार हे एकसमान असल्याचे आढळून आले. सदर पाहणी ही जोडभार बदल करण्याच्या प्रक्रियेचा भाग नसून, केवळ तक्रारींची प्राथमिक पडताळणी व वस्तुनिष्ठ स्थिती स्पष्ट करण्यासाठी करण्यात आलेली आहे.

विद्युत जोडभारात कोणताही बदल करण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी नियमानुसार महावितरण कंपनीच्या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करुन इतर अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मांडकी (जि.संभाजीनगर) येथील चैतन्य कानिफनाथ निवासी मतिमंद शाळेतील विद्यार्थ्यांना केलेली अमानुष मारहाण**

**(४) * २६८६६ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रविंद्र चव्हाण (डोंबिवली), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांडकी (जि.संभाजीनगर) येथील चैतन्य कानिफनाथ निवासी मतिमंद शाळेतील विद्यार्थ्यांना हातपाय बांधून कुकरच्या झाकणाने अमानुषपणे मारहाण केल्याचे माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अमानुष कृत्यांमुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि शारीरिक सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला असतानाही संस्थेच्या व्यवस्थापनानेही या घटनांकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी संस्थापक, शिक्षक व कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर घटनेशी संबंधित मारहाण करणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांवर फौजदारी कार्यवाही करण्यात आलेली असून एकूण ६ कर्मचाऱ्यांना निलंबित करुन पुढील चौकशी सुरु आहे. संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्रासंदर्भात निर्णय घेण्यासाठी सक्षम प्राधिकारी तथा आयुक्त, दिव्यांग कल्याण यांनी दिनांक १७ डिसेंबर, २०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली आहे. संस्थेच्या अतिरिक्त म्हणणे व कागदपत्रे सादर करण्यासाठी मुदतवाढीच्या विनंतीवर दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांचेकडे सुनावणी झाली आहे. याबाबतचे आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही आयुक्तालय स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य वीज नियामक आयोगाने दुग्ध प्रक्रिया उद्योगासाठी एकसमान वीज दर लागू करण्याबाबत**

**(५) * २४९४६ श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य वीज नियामक आयोगाने वीज पुरवठ्याचे वेळापत्रक (Time of Day – TOD) प्रस्तावित केले असून, त्यानुसार सकाळी निर्धारित वेळेपूर्वी आणि सायंकाळनंतर वीज वापरासाठी अधिक दर आकारण्याचा प्रस्ताव दिला असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुग्ध संकलन, थंड साठवणूक व दुग्ध प्रक्रिया हे काम प्रामुख्याने पहाटे व संध्याकाळनंतरच होत असल्यामुळे सदर वेळापत्रकानुसार दरवाढ लागू झाल्यास दुग्ध प्रक्रिया उद्योगावर मोठा आर्थिक भार पडणार असून उत्पादन खर्चात देखील लक्षणीय वाढ होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज दर वाढीचा परिणाम दूध खरेदी दरावर होऊन दूध उत्पादक शेतकऱ्यांना कमी दर मिळण्याची शक्यता निर्माण होणार असून, दुग्ध व्यवसायाची आर्थिक शाश्वतता धोक्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दुग्ध प्रक्रिया उद्योग हा कृषीपूरक व अत्यावश्यक उद्योग असतानाही त्याला औद्योगिक दरवाढीच्या स्लॅबमध्ये समाविष्ट केल्यामुळे शासनाच्या दुग्ध व्यवसाय प्रोत्साहन धोरणांशी विसंगती निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी वाढीव दरांचा वीज पुरवठ्याचे वेळापत्रक (TOD) स्लॅब रद्द करून दुग्ध प्रक्रिया उद्योगासाठी एकच एकसमान वीज दर लागू करण्याबाबत आयोगाकडे शिफारस करण्यासह दुग्ध प्रक्रिया उद्योग व दूध उत्पादक शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी या प्रस्तावाची फेरतपासणी करुन आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे.

विद्युत अधिनियम २००३ नुसार महाराष्ट्र वीज नियामक आयोगाला राज्यातील वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर ठरविण्याचा अधिकार आहे. महावितरण कंपनीने नवीकरणीय ऊर्जेवर भर दिला असून, या स्रोतांमधून हरित वीज स्वस्त दरात व दिवसा मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने मा. आयोगाद्वारे निर्देशित केलेल्या ठराविक वर्गवारीच्या ग्राहकांना सौर ऊर्जा तासांदरम्यान (सकाळी ९ ते सायं ५ वा.) लागू वीज आकाराच्या सरासरी २०%-२५% सवलत (आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३०) वीज पुरवठ्याचे वेळापत्रक (Time of Day-TOD Tariff) मंजूर केले आहे. तसेच सकाळी निर्धारित वेळेपूर्वी (००:०० ते ०९:०० या तासात) वीज वापरासाठी कुठलाही अधिक आकार लागू नाही. तथापि, सायंकाळनंतर (सायं ५:०० ते रात्री १२) महागड्या वीज उपलब्धतेमुळे पूर्वी प्रमाणेच अधिक आकार लागू केले आहेत. सदर TOD वीजदराची पुर्नरचना ही केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने (MOP) अधिसूचित केलेल्या वीज (ग्राहकांचे अधिकार) सुधारणा नियम २०२३ च्या नियम ८अ अनुसार आहे.
(२) हे खरे नाही.

दुग्ध संकलनासाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाचे वीजदर आदेश क्र.२२६/२०२२ नुसार वाणिज्य वर्गवारी लागू होती. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने वीजदर आदेश क्र.२१७/२०२४ व क्र.७५/२०२५ नुसार पहिल्या टप्यातील शीतकरण संयंत्र आणि साठवण युनिटसह / शिवाय दुग्ध संकलन केंद्रे ज्यात कोणत्याही दुध प्रक्रियांचा समावेश नाही अशांना कृषी-इतर वर्गवारी लागू केली आहे. त्यानुसार सदर दुग्ध संकलनासाठी वीज पुरवठ्याचे वेळापत्रक (Time of Day-TOD) लागू नाही. तसेच, थंड साठवणूक व दुग्ध प्रक्रिया हे औद्योगिक वर्गवारीत समाविष्ट आहे त्यांनाच वीज पुरवठ्याचे वेळापत्रक (Time of Day-TOD) लागू आहेत
(३) हे खरे नाही.

ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने उपरोक्त दुग्ध संकलनासाठी अधिक दराची वाणिज्यिक वर्गवारी बदल करून कमी दराची कृषी-इतर वर्गवारी लागू केली आहे.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धारणी व चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील गावांमध्ये वीजपुरवठयांसह अन्य सुविधा देण्याबाबत

**(६) * २२९६६ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारणी व चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील रक्षा, कुंड, रंगुबेली, खोपमार चोपन, ढोकडा, खामदा, किन्हीखेडा तर खुटिदा, सुमिता, मारिता, सरोवरखेडा, रायपूर, बोराटया, माखला, माडीझुडप, चुनखडी, नवलगाव, बिच्छुखेडा येथील २१ गांवे स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही अद्याप अंधारात असल्याचे दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रंगुबेली ग्रामपंचायतअंतर्गत येणाऱ्या सहा गावांमध्ये अद्यापपर्यंत कोणत्याच सुविधा देण्यात आल्या नसल्याचे तसेच धारणी व चिखलदरा तालुक्यातील ४० गावांत रस्ता नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये दिनांक ५ डिसेंबर, २०२५ रोजी शासकीय अधिकाऱ्यांनी धारणी व चिखलदरा तालुक्यास भेटी देऊन पाहणी केल्यानंतर त्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने धारणी व चिखलदरा तालुक्यात सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर गावांमध्ये सध्या पारंपारिक पध्दतीने वीज पुरवठा उपलब्ध नाही. धारणी व चिखलदरा तालुक्यातील सदर गावपाडे घनदाट जंगल, व्याघ्र प्रकल्प व संरक्षित वनपरिक्षेत्रात येत असल्याने Forest Conservation Act, १९८० व Wild Life Protection Act, १९७२ अंतर्गत आवश्यक वन परवानग्या घेणे अनिवार्य आहे. त्याअनुषंगाने पारंपारिक वीज पुरवठा करण्याकरीता वन विभागाशी संबंधित विविध परवानग्यांच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

सदर गावांपैकी चोपन व माखला (टेंभुर्नी ढाणा) या गावांमध्ये महाऊर्जामार्फत मायक्रोग्रीड प्रकल्प आस्थापित करण्यात आला आहे. NGO मार्फत कुंड, खामदा, किन्हीखेडा, खोपमार व रक्षा या ५ गावांमध्ये सौर मायक्रोग्रीड प्रकल्प उभारण्यात आले असून, सद्य:स्थितीत सदर प्रकल्पांकरिता महाऊर्जामार्फत दुरुस्ती व क्षमतावाढ प्रस्तावित आहे.

तसेच, सदर गावांमध्ये केंद्र शासनाच्या सौभाग्य योजनेंतर्गत सन २०१८-१९ मध्ये ५ वर्षे देखभाल दुरुस्ती कालावधीसह महाऊर्जामार्फत वैयक्तिक सौर घरगुती दिवे प्रणाली आस्थापित करण्यात आलेली आहे.

(२) व (३) मेळघाट येथील सदर गावांमध्ये पारंपारिक पद्धतीने विजपुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांच्या उभारणीकरीता निधीच्या मंजुरीसंदर्भात व वन परवानगीसंदर्भात कार्यवाही प्रगतीत आहे.

मौजे रायपूर, बोराट्याखेडा, माखला (टेंभुर्नी ढाणा वगळून) व बिच्छुखेडा येथे महाऊर्जामार्फत सौर मायक्रोग्रीड प्रकल्प आस्थापित व कार्यान्वित करण्याकरिता ई-निविदा प्रगतीपथावर आहे. उर्वरीत गावांमध्ये सौर मायक्रो ग्रीड प्रकल्प आस्थापित करण्याकरिता महाऊर्जाकडून ई-निविदा कार्यवाही करण्यात येत आहे.

धारणी व चिखलदरा तालुक्यात शासकीय अधिकाऱ्यांमार्फत पाहणी करण्यात आलेली आहे. रंगुबेली ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या ६ गावांना आठमाही रस्ते उपलब्ध आहेत. यापैकी ४ गावातील रस्त्याची खडीकरणाची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजुर आहेत. उर्वरित २ गावांना जोडणाऱ्या रस्त्यावर प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून रस्त्याचे काम प्रगतीत आहे. धारणी / चिखलदरातील २१ गांवाना आठमाही रस्ते आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील बालकांवरील अत्याचारांमध्ये वाढ झाल्याबाबत**

**(७) * २६७९५ श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या अहवालानुसार राज्यात दररोज सरासरी ६१ बालकांवर अत्याचार होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२३ मध्ये राज्यात बालकांवरील अत्याचाराचे २२ हजार ३९० गुन्हे नोंदविण्यात आले असून राज्य शासनाच्या अहवालानुसार बालकांवरील अत्याचाराच्या गुन्हयांचे प्रमाणात गेल्या तीन वर्षात २१.२ टक्क्यांनी वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालानुसार महाराष्ट्रातील सर्वाधिक बालकांवरील गुन्हयांनुसार मुंबईत ३११०, ठाणे १६३८, पुणे १२१४, मीरा-भाईदरमध्ये १०१६ आणि पुणे ग्रामीण ८७८ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने बालकांवरील अत्याचाराला आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) राष्ट्रीय गुन्हे नोंद विभाग (NCRB) यांचा सन २०२३ चा अहवाल माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये प्रकाशित झाला असून राज्यात बालकांवरील अत्याचारासंदर्भातील गेल्या तीन वर्षातील आकडेवारी खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | वर्ष | नोंद गुन्हें |
|---|---|---|
| १ | २०२१ | १७२६१ |
| २ | २०२२ | २०७६२ |
| ३ | २०२३ | २२३९० |

(३) सदर अहवालानुसार, सन २०२३ मधील बालकांवरील अत्याचाराबाबत प्रमुख शहरामधील दाखल गुन्ह्यांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे :-

| शहराचे नाव | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | उघडकीस आलेल्या गुन्हयांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| मुंबई शहर | २९९२ | २८९५ | ९५.५ % |
| ठाणे शहर | १३२४ | १२९६ | ९७.९ % |

| | | | |
|---|---|---|---|
| पुणे शहर | ३९५ | ३९२ | ९९.२४ % |
| मिरा-भाईंदर | ६०७ | ६०१ | ९९.०१ % |
| पुणे ग्रामीण | ३९५ | ३९५ | १०० % |

(४) बालकांवरील अत्याचाराला प्रतिबंध करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

- बाल न्याय अधिनियम, २०१५ या कायद्याअंतर्गत किमान पोलीस उप अधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या अधिपत्याखाली राज्यातील सर्व ४९ पोलीस घटकांमध्ये प्रत्येकी एक विशेष बाल पोलीस पथक कार्यरत आहे. तसेच, प्रत्येक पोलीस स्टेशन अंतर्गत किमान सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याची बाल कल्याण पोलीस अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. सध्या सर्व पोलीस घटकांत मिळून एकूण ११५६ बाल कल्याण पोलीस अधिकारी कार्यरत आहेत.
- सर्व पोलीस ठाणे पातळीवर पोलीस काका/पोलीस दिदी हे हद्दीतील शाळा, महाविद्यालय येथे भेटी देतात, विद्यार्थ्यांमध्ये महिला व बालकांवरील अत्याचाराबाबत (लैंगिक शोषण, गुड टच / बॅड टच) जागृती करतात, तसेच विद्यार्थ्यांचे संरक्षक, मित्र व मार्गदर्शक म्हणून काम करतात.
- अत्याचार पीडित बालकांच्या समुपदेशनाकरिता राज्यात १२४ महिला विशेष समुपदेशन केंद्र कार्यरत आहेत.
- डायल ११२ च्या माध्यमातून पीडित महिला / बालकांना तातडीची मदत पुरविण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तांदुळवाडी (ता.बागलाण (सटाणा), जि.नाशिक) येथे बनावट नोटा चलनात आणून नागरिकांची होत असलेली फसवणूक**

**(८) * २९३३७ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तांदुळवाडी (ता.बागलाण (सटाणा), जि.नाशिक) येथे बनावट नोटा चलना आणल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बनावट नोटांचे रॅकेट हे थेट वाशिम जिल्ह्यापर्यंत पसरलेले असून, उक्त गुन्ह्यातील आरोपी हा २० हजार रुपयांच्या खऱ्या नोटांच्या बदल्यात ५० हजार रुपयांच्या बनावट नोटा देऊन त्या बाजारात चलनात आणण्याचे काम करुन नागरिकांची फसवणूक करुन मोठ्या प्रमाणात लूट करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक २०.१२.२०२५ रोजी बनावट नोटा चलनात वापरल्याप्रकरणी एकूण १० आरोपींविरुध्द सटाणा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं ७८५/२०२५, भा.न्या.सं.२०२३ चे कलम १७९, १८०, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) सदर गुन्ह्याची व्याप्ती वाशिम जिल्ह्यापर्यंत असल्याचे तपासात निष्पन्न झाली आहे.

दिनांक ०४.१२.२०२५ रोजी वाशिम जिल्ह्यातील कारंजा शहरामध्ये एक इसम हा स्वत:जवळ बनावट नोटा बाळगून असल्याच्या गुप्त बातमीदारामार्फत गुप्त माहिती मिळाल्याने याबाबत शोध घेतला असता सदर इसम मिळून आला. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे ५०० रुपये मूल्य असणाऱ्या छापलेल्या ६९ नोटा मिळून आल्या, सदरच्या नोटा बनावट असल्याची पंचासमक्ष खात्री झाल्याने त्या जप्त करण्यात आल्या असून सदर प्रकरणी पोलीस स्टेशन कारंजा शहर, जि. वाशिम येथे अप. क्र.७२४/२०२५, भा.न्या.सं. २०२३ चे कलम १७९, १८० प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तसेच नाशिक येथील सटाणा पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्ह्यातील दहा आरोपींपैकी एक आरोपी हा सदरच्या गुन्ह्यातील दुसऱ्या आरोपींकडून २० हजार रुपयांच्या खऱ्या नोटांच्या मोबदल्यात ५० हजार रुपयांच्या बनावट नोटा घेत होता व त्या बनावट नोटा सदरच्या गुन्ह्यातील इतर आरोपींच्या मदतीने मार्केटमध्ये चलनात आणत होता. अशा प्रकारे त्यांनी यापूर्वी ३ वेळा बनावट नोटा आणल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे.

(३) सदर गुन्ह्यांबाबत उपरोक्त प्रमाणे दोन ठिकाणी गुन्हे दाखल असून सटाणा पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्ह्यातील एकुण १० आरोपींपैकी ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे व उर्वरित एक आरोपीचा शोध सुरु असून दिनांक ०२.०३.२०२६ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

तसे वाशिम येथे दाखल गुन्ह्यातील एकूण ६ आरोपींपैकी ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे व उर्वरित एक आरोपीचा शोध सुरु आहे. सदर गुन्ह्यातील एका आरोपीकडून त्याच्या ताब्यातील बनवाटी नोटा तयार करण्याचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. वाशिम येथील गुन्ह्यातील अटकेतील आरोपींविरुध्द मिळून आलेल्या सबळ साक्षी पुराव्यांसह दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. तसेच फरार आरोपीचा शोध घेवून त्याच्या अटकेनंतर पुरवणी दोषारोपपत्र मा. न्यायालयात पाठविण्यात येत आहे.

उपरोक्त प्रमाणे दोन्ही गुन्ह्यांतील एक आरोपी फरार असून तोच दोन्ही गुन्ह्यातील इतर आरोपींना बनावट नोटा पुरवत होता. त्याचा शोध घेवून सदरच्या गुन्ह्यांची उकल करण्याच्या दृष्टीने पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यात वायू प्रदूषणात वाढ झाल्याबाबत

**(९) * २३९४९ श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात सन २०२५ या वर्षातील एकूण ३६५ दिवसांपैकी तब्बल २०१ दिवस वायू प्रदूषणाची पातळी अनुमत मर्यादेपेक्षा जास्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील कोळसा खाणी, औष्णिक वीज प्रकल्प, सिमेंट उद्योग व जड वाहतूक इत्यादी कारणांमुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण वाढल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढत्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व श्वसनविकारग्रस्त रुग्णांवर गंभीर परिणाम होत असताना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (MPCB) प्रदूषण नियंत्रणाबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन जबाबदार असलेल्या संबंधित उद्योगांवर व निष्काळजी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह प्रदूषण नियंत्रणासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांना वेळोवेळी भेटी देऊन संमतीपत्रातील अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याचा कारणास्तव जल (प्रदूषण व प्रतिबंध नियमन) कायदा, १९७४ व वायू (प्रदूषण व प्रतिबंध नियमन) कायदा, १९८१ अंतर्गत कारवाई करण्यात येते.

प्रादेशिक परिवहन विभाग, चंद्रपूर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार सन २०२३ ते माहे जानेवारी २०२६ या कालावधीत ताडपत्री आच्छादित न करता वाहतूक करणारी एकूण १८०७ वाहने तपासली असून, दोषी आढळलेल्या एकूण ५४० वाहनधारकांकडून रु.२२,५१,५००/- इतका दंड वसूल करण्यात आला. तसेच एकूण १२ वाहनांच्या नोंदणीचे निलंबन, ६० वाहनांच्या परवान्याचे निलंबन व ७२ वाहनांचे अनुज्ञप्तीचे निलंबन करण्यात आले आहे. PUC प्रमाणपत्राच्या अनुषंगाने सन २०२३ ते माहे जानेवारी-२०२६ पर्यंत एकूण १७३६६ वाहने तपासण्यात आली. त्यापैकी ६३४० वाहने दोषी आढळली व त्यांच्याकडून रु.९८,४९,८००/- इतके तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्याबाबत

**(१०) * २९२१९ श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहंकार देऊळगाव (ता.जि.जालना) शहरातल्या घाटी रुग्णालय परिसरात २८ वर्षीय श्री.चरण रायमलु या तरुणाची गोळी झाडून हत्या करण्यात आली असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जालना जिल्ह्यातून छत्रपती संभाजीनगर येथे ३५ ते ४० हजार रुपयांत गावठी पिस्तुलांची तस्करी होत असून, अपहरण व व्यापाऱ्यांकडून खंडणी मागण्याच्या घटना देखील निदर्शनास आल्या असून गुंडगिरी, खंडणी व टोळीयुद्धामुळे येथे सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शहरात किरकोळ वादातून गावठी पिस्तूल, तलवार व चाकूने हल्ले होत असल्याच्या घटना सातत्याने घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जालना जिल्ह्यात सन २०२४ मध्ये ३८ गुन्हे, सन २०२५ मध्ये ४५ तर आतापर्यंत ९२ खुनांचे गुन्हे घडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, छत्रपती संभाजीनगर शहरातील सिडको चौक ते चिखलठाणा पर्यंत जालना रोडच्या दोन्ही बाजूंच्या वसाहतीमध्ये सातत्याने लूटमार, चाकूहल्ला, गुंडांची दडपशाही सारखे प्रकार खूप वाढले असून नशेखोरांची संख्येत लक्षणीय वाढ झाल्याने स्थानिक नागरिकांना या रस्त्यावरुन चालणे देखील जिकरीचे होऊन नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह वाढत्या गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदरील घटना जालना शहरातील घाटी रुग्णालय परीसरात दिनांक २३.०१.२०२६ रोजी घडली आहे. सदर घटनेबाबत दिनांक २४.०१.२०२६ रोजी कदीम पोलीस स्टेशन, जालना येथे गु.र.नं. ३८/२०२६ कलम १०३(१), ६१(२)(a), ३(५) भारतीय न्याय संहिता, सह कलम ३,५,२५,२७ भारतीय हत्यार कायदा, सह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील ४ आरोपींपैकी २ आरोपींना दिनांक २४.०१.२०२६ रोजी तात्काळ अटक करण्यात आली असून उर्वरित दोन आरोपींचा शोध सुरु आहे.
(२) जालना जिल्हा घटकात गावठी पिस्तुलाची तस्करीच्या घटना निदर्शनास आलेल्या नाहीत.

जालना जिल्ह्यात सन २०२४ मध्ये अवैध अग्निशस्त्राचे ११ गुन्हे दाखल असून त्यात एकूण १६ पिस्तूल जप्त करण्यात आले आहेत व सन २०२५ मध्ये अवैध अग्निशस्त्राचे २९ गुन्हे दाखल असून त्यात एकूण ३३ पिस्तूल जप्त करण्यात आली आहे.

तसेच पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर घटकात शस्त्र अधिनियमांतर्गत केलेल्या कारवायांबाबत तपशिल खालील प्रमाणे आहे:-

| सन | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| २०२४ | १३७ | १३७ | १,०९,३००/- |
| २०२५ | ८८ | ८८ | १८,५५०/- |
| २०२६ (जाने. अखेर) | १३ | १३ | १३००/- |

पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर घटकात खंडणीसंदर्भात दाखल गुन्ह्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे:-

| सन | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | अटक आरोपी |
|---|---|---|---|
| २०२४ | १३ | ११ | १३ |
| २०२५ | १५ | १५ | १९ |
| २०२६ (जाने. अखेर) | ० | ० | ० |

सन २०२४ ते २०२६ (जानेवारी अखेर) मध्ये शस्त्र अधिनियमांतर्गत केलेल्या कारवाईमध्ये क्रांतीचौक पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २२/२०२६ कलम ३०९ (३)(४), ३(५) भा.न्या.स. सह कलम ३,२५ शस्त्र अधिनियम सह कलम ३७(१)(३),१३५ म.पो.का. अन्वये दाखल गुन्ह्यातील एकूण निष्पन्न आरोपींपैकी दोन आरोपी जालना जिल्ह्याचे रहिवाशी असल्याचे निदर्शनास आले आहे.

सन २०२४ ते २०२६ (जानेवारी अखेर) पर्यंत खंडणी संदर्भात दाखल गुन्ह्यात पुंडलीकनगर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ५१/२०२५, भा.न्या.स. कलम १०९, १३७(२)१४०(२), ३०८(४), ६१(२), सहकलम शस्त्र अधिनियम कलम ३, २५, सहकलम १३५ म.पो.का, सहकलम १९२(१) मोटार वाहन कायदा अन्वये दाखल गुन्ह्यातील एकूण १० आरोपींपैकी ०७ आरोपी हे जालना जिल्ह्याचे रहिवाशी असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) जालना जिल्ह्यात खून या सदराखाली दाखल गुन्ह्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

| सन | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | दोषारोपपत्र दाखल | फायलन | तपासावर |
|---|---|---|---|---|---|
| २०२४ | ३८ | ३८ | ३७ | १(अबेट) | ० |
| २०२५ | ४५ | ४५ | ३८ | ० | ७ |
| २०२६ | ६ | ६ | ० | ० | ६ |
| **एकूण** | **८९** | **८९** | **७५** | १(अबेट) | १३ |

(४) व (५) पोलीस आयुक्तालय छत्रपती संभाजीनगर शहरातील सिडको चौक ते चिखलठाणा विभागातील शाळा, महाविद्यालय परिसरात हातगाडी, टपऱ्या इत्यादी मधून अवैध धंदे व अंमलीपदार्थ विक्री करत असल्याचे निदर्शनास येताच महानगर पालिकेमार्फत अवैध धंदे, अंमलीपदार्थ विक्री करण्याऱ्या छोटया मोठया अशा ७० ते ८० टपऱ्या, हातगाडया असे अतिक्रमण निष्कासित करुन त्यांच्याविरुध्द प्रभावी कारवाई करण्यात आली आहे.

अवैध अतिक्रमण करुन दारु विक्री, अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या टपऱ्या तसेच हातगाडी यांच्यावर प्रभावीपणे कार्यवाही करुन आजपावेतो महानगरपालिका यांच्या सोबत संयुक्त कार्यवाही करुन ६९६६ अतिक्रमणे निष्कासित करण्यात आले आहे. त्यामुळे संपूर्ण परिसरातील जालना रोड लगतच्या नशेखोरांवर प्रतिबंध होवून सदरचा रोड व परिसर सुरक्षित करण्यात आला आहे.

तसेच सराईत गुन्हेगार, गुंड प्रवृत्तीचे व्यक्ती यांचेविरुध्द MCOCA, MPDA व हद्दपारी अंतर्गत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे :-

| **MCOCA कारवाई** | | |
|---|---|---|
| **सन २०२४** | **सन २०२५** | **सन २०२६ (जाने. अखेर)** |
| ४ | ७ | १ |

| MPDA **कारवाई** | | |
|---|---|---|
| **सन २०२४** | **सन २०२५** | **सन २०२६ (जाने. अखेर)** |
| १२ | ९ | ४ |

| **हद्दपार कारवाई (म.पो.का.कलम ५५/५६/५७)** | | |
|---|---|---|
| **सन २०२४** | **सन २०२५** | **सन २०२६ (जाने. अखेर)** |
| ५७ | ५० | १० |

पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये सर्वप्रथम अवैधरित्या अंमलीपदार्थ विक्री करणाऱ्या आरोपींविरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा-१९९९ (MCOCA) प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

तसेच पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात नाकाबंदी, कोम्बींग ऑपरेशन, दिवसपाळी/ रात्रपाळीला सतर्क पेट्रोलिंग, अभिलेख्यावरील गुन्हेगार चेकिंग व प्रभावी प्रतिबंधक कारवाई करुन प्रतिबंध केला आहे. तसेच गोपनिय माहितीच्या आधारे अवैध शस्त्र बाळगणारे इसमांवर वेळीच कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर शहर घटकात अंमली पदार्थांविरुध्द केलेली कारवाई-

| सन | केलेली कारवाई | अटक आरोपी | जप्त मुद्देमाल किंमत |
|---|---|---|---|
| २०२४ | १४६ | २३६ | २,२८,६६,४६१/- |
| २०२५ | २८३ | ३३७ | २,८२,१६,६६९/- |
| २०२६ (जाने. अखेर) | १३ | ४१ | ५७,३८,६६०/- |

अशाप्रकारे अवैध अंमलीपदार्थ विक्री, वाहतूक व सेवन कारणाऱ्या इसमांविरुध्द कायदेशिर गुन्हे दाखल करुन व MCOCA अंतर्गत प्रभावी कारवाई करुन नशेखोर, टवाळखोर इसमांना प्रतिबंध केला आहे. तसेच या परिसरात वारंवार गुन्हे करणाऱ्या ३१ सराईत गुन्हेगारांविरुध्द कलम ५५/५६/५७ म.पो.का.अंतर्गत हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे.

तसेच Nitrazepam, Nitrason१०, Codein Phospate यासारखे मनोव्यापारावर परिणाम करणारी औषधे नोंदणीकृत डॉक्टरांच्या प्रिस्क्रीप्शन शिवाय विक्री करणाऱ्या मेडीकल दुकानांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच त्यांचा परवाना रद्द करण्यासाठी ड्रग इन्सपेक्टर यांना कळविले आहे. तसेच याबाबत ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म वर यासारखी औषधी विक्री होणार नाही याबाबत ई-कॉमर्स प्रतिनिधींची बैठक घेवून त्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

अंमलीपदार्थांची तस्करी करणाऱ्या ट्रव्हल्स बस यांच्यावरही गुन्हे दाखल करण्यात आले आहेत व अशा पध्दतीने अंमली पदार्थांची अवैध वाहतूक रोखण्यासाठी खाजगी ट्रव्हल्स बस, कुरीअर कंपन्या यांच्या प्रतिनिधींची देखील बैठक घेवून याबाबत उपाययोजना करुन दक्षता घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांना तात्काळ कृषी पंप उपलब्ध करून देण्याबाबत**

**(११) * २५२८४ श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.हिकमत उढाण (घनसावंगी), श्री.बाबुराव कदम-कोहळीकर (हदगाव), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा शाश्वत व मोफत वीज मिळण्यासाठी केंद्र शासनाच्या कुसुम-ब व मुख्यमंत्री सौर कृषि पंप या महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात येऊन सौर कृषि पंपाचे वितरण करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विशेषत: पुणे, बुलढाणा, जालना, अहिल्यानगर, परभणी, नांदेड, हिंगोली व वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सदर योजनेंतर्गत शेतकऱ्यांनी अनुदानाची रक्कम भरल्यानंतर ६० दिवसांत सौर कृषि पंप बसवून देणे बंधनकारक असताना तसेच काही जिल्ह्यात शेतकऱ्यांनी पंप बसविण्यासाठी खड्डे खोदूनही काम करण्यास अनेक जिल्ह्यात सदर पंप बसवून देण्यास विलंब लागत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून प्राप्त झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन नियमानुसार शेतकऱ्यांनी केवळ कोटेशनची रक्कम (पात्रतेनुसार १० टक्के किंवा ५ टक्के) महावितरणकडे भरल्यानंतर सर्वेक्षणापासून ते सौर पंपाचा खांब उभा करणे, पॅनेल बसविणे आणि पाण्याची चाचणी घेण्यापर्यंतची सर्व कामे संबंधित ठेकेदार कंपनीने करावयाची असतांनाही यासाठी लागणारे साहित्य

(सिमेंट, वाळू, खडी) आणि मजुरीचा खर्च शेतकऱ्यांकडून वसूल करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी उक्त योजनेचे कंत्राट घेतलेल्या एजन्सी व ठेकेदाराकडून सौर कृषि पंपासाठी शेतकऱ्यांची पिळवणूक होत असल्याबाबत समर्थन संस्थेने मा.मुख्यमंत्री, मा. ऊर्जा राज्यमंत्री, सचिव (ऊर्जा) यांच्याकडे दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित एजन्सी व ठेकेदारांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यासह शेतकऱ्यांना सौर कृषि पंप तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. मुख्यमंत्री सौर कृषि पंप योजनेंतर्गत १ लाख सौर कृषी पंप आस्थापित करण्याचे उद्दिष्ट माहे जून, २०२२ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. राज्यात केंद्र शासनाची कुसुम-ब व AIIB बँक कर्ज निधी अंतर्गत मागेल त्याला सौर कृषी पंप योजना राबविण्यात येत आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.

पीएम कुसुम व मुख्यमंत्री सौर कृषि पंप योजनेंतर्गत कंत्राट घेतलेल्या एजन्सी व ठेकेदाराकडून सौर कृषि पंपासाठी शेतकऱ्यांची पिळवणूक होत असल्याबाबत समर्थन संस्थेचे निवेदन प्राप्त झाले आहे. तसेच महावितरणकडे २ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर दोन्ही तक्रारीची शहानिशा केल्यानंतर संबंधितांना सौर पंप बसवून दिलेला असल्यामुळे, कोणतीही तक्रार प्रलंबित नसल्याचे तक्रारदारांनी कळविले आहे.

(५) सौर पंप धारक शेतकऱ्यांना तक्रार नोंदवण्यासाठी सीआरएम पोर्टल तयार केले असून तक्रारीचे निरसन वेळेत केले जाते. सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांमध्ये जनजागृती करणे बाबत प्रत्येक उपविभागात सौर पंप लाभार्थ्यांचे तालुकास्तरावर मेळावे घेतले आहेत. निविदेच्या अटी व शर्तीनुसार कार्यादेश मिळाल्यापासून ६० दिवसाच्या आत सौर पंप आस्थापित करणे आवश्यक आहे. सौर कृषीपंप आस्थापित करणेस ६० दिवसांपेक्षा जास्त विलंब झाल्यास पुरवठादारांना ०.५% प्रती आठवड्या प्रमाणे दंड आकारणी करण्यात येत आहे

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील अवसायनात निघालेल्या बाबाजी दाते महिला सहकारी बँकेत झालेला गैरव्यवहार

**(१२) * २८३६२ श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील अवसायनात निघालेल्या बाबाजी दाते महिला सहकारी बँकेतील सुमारे २४२ कोटी रुपयांचा गैरव्यवहार निदर्शनास आला असून, या बँकेतील तत्कालीन संचालक मंडळ, व्हॅल्यूवर, लेखा परीक्षक व कर्मचाऱ्यांवर माहे जानेवारी, २०२५ मध्ये गुन्हे दाखल झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बँकेत जेष्ठ नागरिक, सेवानिवृत्त नागरिक या ठेवीदारांचे पैसे अडकून पडल्याने त्यांना अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने ८० टक्के रक्कम मिळण्यासाठी शासनाकडे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधितांविरुद्ध कारवाई करणेसह ठेवीदारांना त्यांची रक्कम परत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) यवतमाळ जिल्हयातील अवसायनात (Liquidation) निघालेल्या बाबाजी दाते महिला सहकारी बँकेतील गैरव्यवहाराबाबत विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था (साखर), अमरावती यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बँकेतील तत्कालीन संचालक मंडळ, व्हॅल्यूअर, लेखा परीक्षक, कर्मचारी अशा एकूण २०६ आरोपी विरुध्द पो.स्टे.अवधुतवाडी जि.यवतमाळ येथे अप क्र.९२२/२४ भारतीय दंड संहितेच्या कलम ४०६, ४०९, ४१७, ४१८, ४२०, ४२१, ४२४, ४६७, ४६८, ४७१, ४७७ (अ), १२० (ब) व १०९ सह महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तिय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ च्या कलम ३ अन्वये दि.१३.०८.२०२४ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर बँकेत सुमारे २४२ कोटीं रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी १५ आरोपींविरुध्द दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करण्यात आले असून उर्वरित आरोपींच्या बाबतीत तपास सुरु असून दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर बँकेवर दि.०८.११.२०२१ रोजी रिझर्व बँक ऑफ इंडिया तर्फे निर्बंध लावण्यात आले आहे. त्यावेळेस एकूण ठेवीदार ८९,०४९ यांचे ४८५.५३/- कोटी रुपये देणे बाकी होते, त्यापैकी ८१,३९३ ठेवीदारांना ३४१.१२/- कोटी रक्कम परत करण्यात आली आहे. रुपये ०५ लाखापेक्षा जास्त रक्कम देणे बाकी असलेल्या ७६५६ ठेवीदारांची १४४.७१ कोटी रक्कम देणे बाकी आहे.

सदर ठेवीदारांना बँकेकडे उपलब्ध असलेल्या तरलतेमधून प्रमाणशीर अनुपात वाटप पध्दतीने (pro rata basis) २० टक्के रक्कम अदा करण्यात आली आहे.

बँकेच्या ठेवीदारांनी उर्वरित ८० टक्के रक्कम मिळण्यासाठी दिनांक ०६/०१/२०२६ रोजी बँकेच्या अवसायक यांना तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ या कार्यालयास निवेदन दिले आहे.

दि.३१.०१.२०२६ पर्यंत बँकेच्या ५१६ कर्जदारांकडून एकूण रु.५०९.९८ कोटी कर्ज वसुल करणे बाकी आहे. सदर कर्जाची वसुली जशी-जशी होत जाईल त्यानुसार ठेवीदारांना अवसायक (Liquidator) यांच्या मार्फत प्रमाणशीर अनुपात वाटप पध्दतीने (pro rata basis) ठेवींच्या रक्कमा परत करण्याचे नियोजित आहे.

सदर प्रकरणी चाचणी लेखापरीक्षणामध्ये दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अंतर्गत प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंदखेड राजा (जि. बुलढाणा) येथील जिजाऊ जन्मस्थळ या तीर्थक्षेत्राचा विकास करण्याबाबत

**(१३) * २३४९२ श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेड राजा (जि.बुलढाणा) हे राजमाता जिजाऊंचे जन्मस्थळ या तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने रुपये ४११ कोटी इतक्या रकमेचा विकास आराखडा जाहीर केला असूनही प्रत्यक्षात या आराखड्याची अंमलबजावणी झाली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजवाडा,राममंदिर, साबळकर वाडा, मोती तलाव परिसरासह अन्य ऐतिहासिक वास्तूंची पडझड व दुरवस्था होत असतांना त्यांचे जतन व संवर्धन न झाल्यामुळे अमूल्य ऐतिहासिक वारसा नष्ट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तीर्थक्षेत्राला राष्ट्रीय स्मारक घोषित करण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित असून केंद्र व राज्य शासनाकडून याबाबत निर्णय न घेतल्यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर या स्थळाचा अपेक्षित विकास व पर्यटनाला चालना मिळत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणास्थान असलेल्या सिंदखेड राजा या ऊर्जा स्थळाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शिवप्रेमी, नागरिक व इतिहास अभ्यासकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिजाऊ जन्मस्थळ व सर्व ऐतिहासिक वास्तूंच्या जतन-संवर्धन, राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा देणे व जाहीर विकास आराखड्याची अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) सांस्कृतिक कार्य विभागास, जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाला असून, पुरातत्व विभागाच्या अखत्यारित असणाऱ्या स्मारकांची जतन संवर्धनाशी संबधित रु.१२५.७८ कोटी इतक्या रकमेच्या कामांना संचालक पुरातत्व वस्तुसंग्रहालये यांनी कामांना तांत्रिक मान्यता दिलेली आहे, सदर आराखड्याच्या मान्यतेनंतर जतन संवर्धनाशी निगडीत कामे पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयामार्फत करण्यात येतील.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात ६९ रडार इंटरसेप्टर वाहने विनावापर पडून राहिल्याबाबत

**(१४) * २४११६ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध आर.टी.ओ. कार्यालयांमध्ये कोट्यवधी रुपये खर्च करून रस्ते सुरक्षित करण्यासाठी खरेदी करण्यात आलेली ६९ रडार इंटरसेप्टर वाहने प्रत्यक्ष वापरात न आणता सुमारे तीन महिने विनावापर पडून राहिल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वाहने वापरात न आल्यामुळे वाहतूक नियमांची अंमलबजावणी प्रभावीपणे न होणे, वेग नियंत्रणात अडचणी येणे तसेच अपघात प्रतिबंधासाठी आवश्यक असलेली यंत्रणा निष्क्रिय झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ६९ रडार इंटरसेप्टर वाहने तीन महिने विनावापर पडून राहिल्यामुळे दंड वसुली, वाहतूक महसूल तसेच सार्वजनिक सुरक्षेशी संबंधित बाबींमध्ये वाहनांच्या निष्क्रियतेमुळे कोट्यवधी रुपयांचा खर्च वाया गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कार्यालयातील नियोजनातील त्रुटी, प्रशासकीय विलंब व निष्काळजीपणामुळे वाहने वेळेत वापरात आणण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह सदर रडार इंटरसेप्टर वाहनांचा वापर पुन्हा सुरू करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१), (२), (३), (४) व (५) हे खरे नाही.

गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एमव्हीडी-०३२३/प्र.क्र.९६/परि-४, दिनांक २१.०८.२०२४ अन्वये गृह (परिवहन) विभागाच्या अधिपत्याखालील कार्यरत वायुवेग पथकांसाठी ६९ नवीन इंटरसेप्टर वाहने व सदर वाहनांवर रडार आधारित अत्याधुनिक उपकरणे (Vehicle Top Mounted Radar Device) बसविणेकरिता प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार परिवहन आयुक्त कार्यालयाकडून ६९ वाहनांवर बसविण्यात येणाऱ्या रडार आधारित अत्याधुनिक उपकरणांची खरेदी करण्याकरिता निविदा प्रक्रिया करण्यात येऊन दि.१४.१०.२०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले.

प्रस्तुत प्रकरणी सर्व तांत्रिक प्रक्रिया पार पाडल्यानंतर व सर्व अनुपालन कागदपत्रे सादर केल्यानंतर ई-चालान कामकाजाला माहे डिसेंबर, २०२५ मध्ये सुरुवात करण्यात आली. दरम्यानच्या काळात सदर वाहनांद्वारे अंमलबजावणीविषयक व रस्ता सुरक्षाविषयक दंड वसुली व इतर अनुषंगिक कामकाज सुरु होते.

सद्यस्थितीत सदर रडार आधारित इंटरसेप्टर वाहनांद्वारे रस्ता सुरक्षाविषयक, मोटार वाहन कायदाविषयक उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर ई-चालान जारी करण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## पुणे जिल्ह्यातील पवना व इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाची अंमलबजावणी करणेसह नदी प्रदूषण रोखण्याबाबत

**(१५) * ३०२७२ श्री.महेश (दादा) किसन लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (जि.पुणे) हद्दीतील पवना व इंद्रायणी नदीतील पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी 'पीएमआरडीए'ने सुधारित प्रकल्प अहवाल (DPR) सादर केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालास 'एनआरसीडी'ने (NRCD) तत्त्वतः मान्यता दिली असतानाही शासनाच्या पर्यावरण विभागाने अंतिम मंजुरीचा प्रस्ताव अद्याप केंद्र सरकारकडे पाठविलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पासाठी लागणाऱ्या सुमारे ८८९ कोटी रुपयांच्या निधीपैकी केंद्र सरकार ६० टक्के वाटा देणार असताना केवळ प्रशासकीय विलंबाअभावी निधी मिळण्यास विलंब होऊन कामास अडथळा निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भोसरी, ताथवडे आणि मामुर्डी येथे प्रस्तावित सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) वेळेत कार्यान्वित न झाल्यामुळे उपरोक्त नद्यांचे पाणी मोठ्या प्रमाणावर प्रदूषित होत असून सुमारे ३० लाख नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पवना व इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पांना गती देण्यासाठी व प्रदूषण रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशतः खरे आहे.

- राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत इंद्रायणी नदी व पवना नदी संवर्धनाकरिता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सादर करण्यात आलेला अनुक्रमे एकूण रक्कम रूपये १७९७ कोटी व ११७१ कोटी रूपये इतक्या रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल दि.११/०८/२०२५ रोजी राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालय, केंद्रीय जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार यांना सादर करण्यात आला होता.
- राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालयामार्फत इंद्रायणी नदी संवर्धनाच्या प्रस्तावामध्ये उपस्थिती करण्यात आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने सुधारित प्रकल्प अहवाल दि.१७/१२/२०२५ रोजी राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालय, केंद्रीय जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे सादर करण्यात आला आहे.
- पवना नदी संवर्धन प्रस्तावाच्या अनुषंगाने राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालयामार्फत उपस्थित त्रुटींची पूर्तता करून सुधारित प्रकल्प अहवाल सादर करण्याबाबत विभागाच्या दि.१३/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना कळविण्यात आले असून सुधारित प्रकल्प अहवाल शासनास अद्यापि अप्राप्त आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या अहवालानुसार सद्यस्थितीत भोसरी येथे एकूण १२ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र कार्यान्वित असून ताथवडे व मामूर्डी येथे अनुक्रमे ४० दशलक्ष लिटर प्रतिदिन व २० दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्याचे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नियोजित आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत इंद्रायणी नदी व पवना नदीच्या पाण्याची गुणवत्ता सुधारण्याकरिता नदी सुधार प्रकल्पाचा आराखडा तयार करणेत आला असून पहिल्या टप्प्यात नदीच्या कडेने इंटरसेप्टर लाईनचे काम पूर्ण झाले आहे. नाल्याद्वारे नदीत मिसळणारे सांडपाणी इंटरसेप्टर लाईनद्वारे संकलित करुन नजीकच्या मैलाशुध्दीकरण केंद्रामध्ये त्यावर प्रक्रिया करणे प्रस्तावित आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील पवना, इंद्रायणी व मुळा नदीपात्र उगमापासून ते संगमापर्यंत स्वच्छ ठेवण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांसाठी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली सर्व संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांची समिती गठीत करण्यात आली आहे.

सदर समितीच्या शिफारशींनुसार औद्योगिक क्षेत्रातून तयार होणाऱ्या रसायनयुक्त पाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता सीईटीपी बांधण्याकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सल्लागार नियुक्त करण्यात आले असून औद्योगिक सांडपाण्यामुळे होणारे प्रदूषण रोखण्याकरिता आवश्यक कामांचा प्रकल्प आराखडा तयार करणेचे काम प्रगतीपथावर आहे.

आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या अहवालानुसार नद्यांचे पाणी प्रदूषित होऊन नागरिकांच्या आरोग्याबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाकडे प्राप्त झाल्या नसल्याचे कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोरची (जि. गडचिरोली) तालुक्यात वीज पुरवठा अखंडित स्वरूपात सुरु ठेवण्याबाबत

**(१६) * २८७८० श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरची (जि.गडचिरोली) तालुक्यात मागील काही दिवसापासून वादळी वाऱ्यामुळे बहुतेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला परंतु तो पुर्ववत करण्यासाठी महावितरणाने योग्य वेळेत कार्यवाही न केल्याने या दुर्गम विभागातील काही महिलांनी संबंधित महावितरण कार्यालयावर मोर्चा नेला असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुटेकसा (ता.कोरची) येथे तीन वेगवेगळया वीज दुरुस्तीची कामे कंत्राटदारांना देण्यात आली असून उक्त कंत्राटदारांनी निधी घेऊनही वीज दुरुस्तीची कामे केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच जिल्ह्याच्या सिमेवर असलेल्या डोंगराळ कोरची तालुक्यात वारंवार वीज खंडित होत असूनही महावितरणकडून याबाबत त्वरीत योग्य कार्यवाही होत नसल्याने सदर परिसरातील नागरिकांची विजेअभावी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबंधित कंत्राटदारांविरुद्ध कारवाई करण्यासह उक्त जिल्ह्यातील वीजपुरवठा अखंडित स्वरूपात सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

माहे जानेवारी, २०२६ मध्ये कोरची (जि.गडचिरोली) येथील वीजपुरवठा वादळी वाऱ्यामुळे खंडित झाला नव्हता. तथापि, दि.११ व १२ जून, २०२५ रोजी आलेल्या भीषण वादळामुळे कोरची (जि.गडचिरोली) येथील महावितरणचे उच्चदाब व लघुदाब वाहिनीचे अनुक्रमे २३५ व ९५ खांब उन्मळून पडले. तसेच इतर काही ठिकाणी वीज वाहिनी लगत असलेल्या झाडांच्या फांद्या वीज वाहिनीवर पडून वीज तारा तुटल्यामुळे कोरची व परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता.

महावितरणचे झालेले मोठ्या प्रमाणातील नुकसान, साधन सामुग्री घटनास्थळी नेण्यात येणाऱ्या अडचणी, प्रतिकूल हवामान इत्यादी वर मात करून कोरची उपविभागातील अधिकारी, कर्मचारी व देखभाल दुरुस्तीची कामे करणारे कंत्राटदार या सर्वांनी दि.१४.०६.२०२५ रोजी सदर वाहिनी पूर्ववत केली. त्यानंतर टप्प्या टप्प्याने लघुदाब वीज वाहिन्यांचा वीज पुरवठा सुरु केला. दरम्यान काही दिवस वीजपुरवठा बंद असल्याने तेथील स्थानिक महिलांनी उपविभागीय कार्यालय, कोरची येथे मोर्चा आणला होता. परंतु, मोर्चातील महिलांना परिस्थितीची माहिती दिल्यानंतर त्या माघारी गेल्या होत्या.

(२) हे खरे नाही.

मौजा गुटेकसा, ता.कोरची येथील वीजपुरवठा सुरळीत करण्याकरीता मे.यश इलेक्ट्रिकल्स, मे.आल्लापल्ली, टिएनएस इंफ्रास्ट्रक्चर्स, वडसा, मे.महाकाली इंजिनिअरींग वर्क्स, बल्लारशा या तीन कंत्राटदारांना वीज वाहिनी दुरुस्तीची कामे दिलेली होती. त्यानुसार त्यांनी दिलेली कामे पूर्ण केली आहेत.

(३) हे खरे नाही.

कोरची तालुक्यातील उच्चदाब वाहिन्या ह्या घनदाट जंगलातून जात असल्यामुळे वादळ, वारा व पाऊसामुळे वाहिन्यालगत असलेली झाडे वा झाडांच्या फांद्या वीज वाहिन्यांवर पडून वीज पुरवठा खंडित होत

असतो. परंतु सदर खंडित झालेला वीजपुरवठा महावितरण कंपनीचे कर्मचारी व सुचिबद्ध कंत्राटदार यांच्यामार्फत त्वरित सुरळीत करण्यात येतो.

(४) कोरची तालुक्यातील उच्चदाब वाहिन्या ह्या घनदाट डोंगराळ, घनदाट जंगलातून जातात. कोरची तालुक्यामध्ये एकूण १२५ गावे असून सदर गावांना ३३/११ के.व्ही. कोरची व ३३/११ के.व्ही. ढोलडोंगरी या २ उपकेंद्रामधून वीजपुरवठा करण्यात येत आहे.

मौजा कुरखेडा, जि. गडचिरोली येथे १३२ के.व्ही. उपकेंद्राचे काम सुरु असून सदर काम पूर्ण झाल्यानंतर ३३ के.व्ही. कोरची वाहिनीची लांबी कमी होऊन योग्य दाबाचा व अखंडित वीजपुरवठा होण्यास मदत होणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात प्लास्टिक वापरावर बंदी असतानाही प्लास्टिकची निर्मिती आणि विक्री होत असल्याबाबत

**(१७) * २४६१२ श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ७५ मायक्रोन पेक्षा कमी जाडीच्या सर्व प्रकारच्या प्लास्टिकवर दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ व १२० मायक्रोनपेक्षा कमी जाडीच्या सर्व प्रकारच्या प्लास्टिकवर दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ पासून बंदी घालण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्लास्टिक साहित्याची निर्मिती, आयात- निर्यात, साठवणूक, विक्री आणि वापर करण्यास प्रतिबंध तसेच प्लास्टिक ग्लास, चमचे हे सुद्धा सार्वजनिक ठिकाणी ठेवता येणार नसल्याचे महानगरपालिकांनी वेळोवेळी जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विश्वविद्यालय च्या मॉलिक्यूलर बायोलॉजी एंड जेनेटिक इंजिनियरिंग विभागाच्या दोन प्राध्यापकांच्या अभ्यासातून शहरी व ग्रामीण भागात प्लास्टिक वापर जास्त प्रमाणात होत असल्याने नदी व तलाव प्रदूषित होऊन पिण्याच्या पाण्याच्या नळाद्वारे नागरिकांना मिळणाऱ्या पाण्यातून प्लास्टिकचे माइक्रोप्लास्टिक्स शरीरात जाऊन भविष्यात आजारांना तोंड द्यावे लागेल असे निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्लास्टिक कचरा व्यवस्थापन अंमलबजावणीकरिता व्यापक कृती आराखडा तयार करण्यासाठी व राज्यातील प्लास्टिक साठा जप्त करण्याची मोहीम नियमित राबविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच, प्लास्टिक बंदीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर महाराष्ट्र विघटनशील कचरा नियंत्रण कायदा, २००६ अंतर्गत तरतुदीनुसार आजपर्यंत कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने सुधारीत प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०२१ अन्वये दिनांक ३१.१२.२०२२ पासून १२० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या व्हर्जिन / पुनर्नविनीकरण कॅरीबॅगवर बंदी घालण्यात आली आहे. तत्पुर्वी दिनांक ३०.०९.२०२१ ते दिनांक ३१.१२.२०२२ पर्यंत ७५ मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या व्हर्जिन / पुनर्नवीणीकरण कॅरीबॅगवर बंदी होती.

परंतु, राज्यात महाराष्ट्र प्लास्टीक व थर्मोकॉल (उत्पादन, वापर , विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८ च्या अधिसूचनेनुसार प्लास्टिक पासून बनविलेल्या पिशव्यांवर (हँडल असलेल्या व नसलेल्या) बंदी आहे.

तसेच, अन्न धान्य व किराणामाल व घाऊक विक्रेत्यांना अन्न धान्य व किराणामाल सिलबंद प्लास्टिक व पॅकेजींग आवरणात विक्री करण्यास ५० मायक्रॉन पेक्षा अधिक जाड असणे बंधनकारक आहे.

(२) महाराष्ट्र प्लास्टीक व थर्मोकॉल (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८, दिनांक २३.०३.२०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार एकल वापर प्लास्टिक, ग्लास, चमचे यावर बंदी आहे.

सदरची अधिसूचना राज्यातील कोणत्याही व्यक्ती, व्यक्तींचा समुह, शासकीय व अशासकीय संस्था, शैक्षणिक संस्था, कार्यालये, धार्मिक स्थळे, धार्मिक संस्था, हॉटेल, ढाबे, दुकानदार, मॉल्स, विक्रेता, कॅटरर्स, घाऊक विक्रेता, किरकोळ विक्रेता, व्यापारी, फेरीवाला, वितरक, वाहतूकदार, सेल्समन, मंडई, उत्पादक, स्टॉल्स, पर्यटन क्षेत्रे, वने व संरक्षित वने, इको सेन्सीटीव्ह क्षेत्रे, सर्व सागरी किनारे, सर्व सार्वजनिक ठिकाणे, बस स्थानके, रेल्वे स्थानके इ. ठिकाणी लागू आहे. सदर अधिसूचनेच्या अंमलबजाणीसाठी व नियमातंर्गत कारवाईसाठी विविध शासकीय अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. त्यामध्ये महानगरपालिका आयुक्त, उपायुक्त, नगरपालिकांचे मुख्याधिकारी, शॉप्स अँड एस्टॅबलशमेंट अधिकारी व निरीक्षक, अनुज्ञाप्ती निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, आरोग्य अधिकारी, प्रभाग अधिकारी यांचा समावेश होतो.

तसेच, केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने सुधारीत प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०२१ अन्वये एकल वापर प्लास्टिक ग्लास, चमचे यावर बंदी आहे.

(३) कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या दिनांक २४.०२.२०२६ रोजीच्या अहवालानुसार भारतातील व परदेशातील सन २०२५ पर्यंत प्रकाशित झालेल्या शोधनिबंधाचे अध्यायन करुन निकष काढून पुनरावलेखन लेख लिहीण्यात आलेला आहे. समुद्र, नदी व तलावामधून माइक्रोप्लास्टिक्स अतीसुक्ष्म असल्यामुळे पिण्याच्या पाण्याव्दारे शरीरामध्ये जमा होऊन आरोग्यावर वाईट परिणाम होत असलेबाबत कळविण्यात आले आहे.

(४) एकल वापर प्लास्टिक वस्तुंचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी आणि साठवणूक करणाऱ्या आस्थापंनावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था व पोलीस विभाग यांच्या पथकांमार्फत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर नियमितपणे कारवाई केली जाते.

(५) महाराष्ट्र विघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ अंतर्गत तरतुदीनुसार माहे एप्रिल, २०२५ ते जानेवारी, २०२६ पर्यंत एकूण १,२४,७८३ आस्थापनांची पाहणी करण्यात आली आहे. त्यापैकी उल्लंघन करणाऱ्या ३३९० आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, एकूण रु.१.५५ कोटी इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच एकूण ६७.५४ मे. टन एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गव्हाणपाडा माहुल येथे टाटा पॉवर वीज निर्मिती प्लांटमधून राखयुक्त पाणी समुद्रात सोडले जात असल्याबाबत

**(१८) * २७५७२ श्री.तुकाराम काते (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गव्हाणपाडा माहुल येथे टाटा पॉवर वीज निर्मिती प्लांट असून येथे कोळशावर वीज निर्मिती केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टाटा वीज निर्मिती कंपनीकडून कोळशाचे राखयुक्त पाणी समुद्राच्या पाण्यात सोडले जात असून कंपनीकडून येथील कांदळवनही कापण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच टाटा पॉवर वीज निर्मिती केंद्रामुळे परिसरात प्रदूषण होत असून त्याचा परिणाम स्थानिक रहिवाशांच्या आरोग्यावर व मच्छीमारीवर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.
(२) टाटा थर्मल पॉवर स्टेशनमध्ये निर्माण होणारी १००% फ्लाय ॲश व बॉटम ॲश, केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार बंद सायलोजमध्ये सुरक्षितरीत्या साठवली जाते. या प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याकरीता प्रक्रिया संयंत्रणा बसविण्यात आली आहे.
तसेच कांदळवनास कोणतीही हानी झाल्याचे आढळून आलेले नाही.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त आरोग्य अहवालानुसार एम/पूर्व विभागातील दवाखान्यात नोंद झालेल्या श्वसन विकाराच्या जसे की, खोकला व दमा इत्यादी आजाराच्या रुग्णसंख्येत लक्षणीय वाढ झाली असल्याचे आढळून आलेले नाही.
तसेच प्रकल्पामुळे कोणतेही प्रदूषण होत नसल्याने मच्छीमारी व्यवसायावरही प्रतिकूल परिणाम झाल्याचे आढळलेले नाही.
(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (MPCB) अधिकाऱ्यांकडून नियमितपणे सदर स्थळी भेटी दिल्या जातात. सदर कंपनी सर्व वैधानिक परवानग्या, पर्यावरणीय अटी व शासनाने निर्धारित केलेल्या नियमांचे पालन करत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी २.० योजनेत बनावट बँक गॅरंटीद्वारे झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१९) * २७५२४ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी २.० योजनेच्या माध्यमातून मे.ओम यश सी.जे.आर. लामाट विया प्रोजेक्ट्स प्रा.लि. कंपनीने सन २०२४ ते २०२६ या कालावधीत महावितरणची सुमारे १०० कोटींची फसवणूक केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त कालावधीत मे.ओम यश सी.जे.आर. लामाट विया प्रोजेक्ट्स प्रा. लि. या कंपनीचे संचालक श्री.भावेशकुमार अश्विनभाई पटेल, श्री.हितेशभाई आणि श्री.हिरेनकुमार लावजीभाई कनानी यांनी ९९ कोटी ५० लाख रुपयांची स्टेट बँक ऑफ इंडिया, जुनागड शाखा (गुजरात) यांच्या नावाची बनावट बँक गॅरंटी तयार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महावितरणच्या नवीकरणीय ऊर्जा विभागातील सहाय्यक महाव्यवस्थापक, श्री.राहुल पन्हाळे यांनी उक्त सादर केलेली बनावट बँक गॅरंटी खरी असल्याचे भासवून व वैयक्तिक आर्थिक फायद्यासाठी संबंधित कंपनीला काम मिळवून देण्यास मदत केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील बनावट बँक गॅरंटीच्या आधारे मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत प्रकल्पासाठी वीज खरेदी करार (पीपीए) प्राप्त केली असल्याने व महावितरणला संबंधित बँक गॅरंटी इनव्होक करता आली नसल्याने शासनाची सुमारे ९९.५० कोटी रुपयांची फसवणूक झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या मे.ओम यश सी.जे.आर. लामाट विया प्रोजेक्ट्स प्रा.लि. कंपनी व संचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे. मे.ओम यश प्रोजेक्ट लिमिटेड या विकासकाने (कंपनीने) आणि त्यांची उपकंपनी मे. ओम यश सी.जे.आर. लामाट विया प्रोजेक्ट्स प्रा. लि. यांनी रुपये ९९.५० कोटी इतक्या रकमेची बनावट बँक हमी दिल्याचे निदर्शनास आले.
(२) हे खरे आहे. संबंधित कंपनीने स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या जुनागड, गुजरात येथील शाखेची बनावट बँक गॅरंटी महावितरणकडे सादर केली आहे.
(३) महावितरणच्या नवीकरणीय ऊर्जा विभागातील संबंधित लेखा अधिकारी यांनी सदर बँक हमीची वैधता तपासण्यामध्ये हयगय केल्याचे प्रथम दर्शनी आढळून आल्याने त्यांना सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे. कर्मचारी सेवा विनियमातील शिस्तभंग कार्यवाही अंतर्गत त्यांची विभागीय चौकशी करण्यात येत आहे.
(४) हे खरे आहे. बँक गॅरंटी बनावट असल्याने महावितरणने प्रस्तावित केलेल्या दंडात्मक कारवाई अंतर्गत बँक गॅरंटीची रक्कम महावितरणकडे जमा होऊ शकली नाही.
(५) संबंधित कंपनी विरुद्ध मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखा विभागात एफ आय आर क्र.३९ दि.१०.०१.२०२६ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. पोलीस तपास चालू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील पोलीस अधिक्षक कार्यालयातील कनिष्ठ लिपिकाने केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२०) * २८११४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील पोलीस अधिक्षक कार्यालयातील लेखा शाखा विभागातील कार्यरत असलेल्या कनिष्ठ लिपिकाने सन-२०२१ ते २०२५ या कालावधीत जिल्ह्यातील पोलीस पाटलांची बनावट यादी तयार करुन व त्याद्वारे तयार केलेली देयके मंजूर करुन मानधनापोटी कोट्यवधी रुपयांच्या निधीचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात चार दोषींविरुध्द गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सन २०२१ ते २०२५ या कालावधीत पोलीस अधीक्षक रायगड, अलिबाग या कार्यालयातील कनिष्ठ लिपीक यांच्याकडे रायगड जिल्ह्यातील सर्व पोलीस पाटील यांचे मानधन देयक मंजूरीचे कामकाज सोपविण्यात आले होते. सदर कनिष्ठ लिपिकाने नमूद कालावधीत पोलीस पाटील यांच्या मानधन मंजुरी प्रक्रियेदरम्यान प्रत्यक्ष हजर नसलेल्या पोलीस पाटील यांची बनावट नावे समाविष्ट करून खोटे देयक व फेरफार केलेल्या याद्या तयार केल्या. तसेच स्वत:ची पत्नी या पोलीस पाटील नसताना त्यांच्या नावाने खोटे कागदपत्र तयार करून मानधन रक्कम मंजूर करून घेतली. याशिवाय काही पोलीस पाटील यांच्या नावांची दुबार नोंद करून

त्यांना अतिरिक्त मानधन देयके अदा केले व पुन्हा त्यांना संपर्क करुन सदरचे मानधन अतिरिक्त असल्याचे सांगून त्यांच्याकडून ती रक्कम रोख/ऑनलाईन स्वरुपात स्वत:कडे जमा करुन घेतले. अशा पद्धतीने आरोपित कनिष्ठ लिपिकाने रु.१,७९,००,८००/- इतक्या शासकीय रकमेचा अपहार करून शासनाची फसवणूक केली आहे.

त्याअनुषंगाने, सदर प्रकरणी अलिबाग पोलीस ठाणे, जि.रायगड येथे दिनांक ११.१२.२०२५ रोजी भारतीय न्याय संहिता कलम ३१६(५), ३१८(२), ३१८(४), ३३६(३), ३३७, ३३८, ३३९, ३४४, ३(५) अन्वये गु.र.नं २४७/२०२५ दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर गुन्ह्यात एकूण ३ आरोपी असून सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे. मुख्य आरोपीने सन २०२१ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अपहारीत केलेल्या शासकीय रकमेमधून विविध मालमत्ता खरेदी केल्याचे तपासात आढळून आले आहे. सदर मालमत्ता जप्त करण्यासाठी भा.ना.सु.सं. कलम १०७ अन्वये मा.न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला असून जप्तीची प्रक्रिया सुरु आहे.

सद्य:स्थितीत सदर गुन्ह्यातील आरोपींना मा.न्यायालयाने जामीन मंजूर केला असल्याने त्यांवर भा.न्या.सं. कलम १२६ अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. तसेच, सदर लिपिकास पोलीस अधीक्षक, रायगड यांच्या दिनांक १०.१२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यातील अनधिकृत वीटभट्ट्या बंद करण्याबाबत

**(२१) * २३२७६ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या अनधिकृत वीटभट्ट्यांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होवून पर्यावरणालाही धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जत तालुक्यातील दुरगाव परिसरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत वीटभट्ट्या सुरू असल्यामुळे या अनधिकृत वीटभट्ट्या कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी ग्रामस्थांनी करून तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले असून तहसीलदारांना निवेदनही देण्यात असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वीटभट्ट्यांतून सतत निघणारा धूर, राख व धुळीमुळे परिसरात प्रदूषण वाढले असून लहान मुले, वृद्ध, आजारी व्यक्तींना श्वसनाचे विकार, दमा, डोळ्याचे आजार व हृदयविकाराचा धोकाही वाढलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून अहिल्यानगर जिल्ह्यातील या अनधिकृत वीटभट्ट्या बंद करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी, अहिल्यानगर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार श्वसनविकाराचे रुग्ण आढ़ळून आलेले नाहीत.

(४) तहसिलदार, कर्जत यांचेकडून प्राप्त अहवालानुसार येथील मौ.दुरगाव, ता.कर्जत एकूण-६४ अनधिकृत विटभट्टी धारकांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८(७) अन्वये माती या गौणखनिजाचा अनधिकृत साठा केलेबाबत दंडात्मक नोटीस देण्यात आली असून नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यात मॅफेड्रोन (एमडी) या अंमली पदार्थाची तस्करी होत असल्याबाबत

**(२२) * २९९६७ श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली आबा कटके (शिरुर), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मॅफेड्रोन (एमडी) या अंमली पदार्थाच्या विक्रीची पाळेमुळे शिरूर (जि.पुणे) व श्रीगोंदे (जि.अहिल्यानगर) तालुक्यात खोलवर रुजली असून यामध्ये पोलिस दलातील पोलिस कर्मचारीच मॅफेड्रोन (एमडी) या अंमली पदार्थांची तस्करी करीत असल्याचे पोलिसांनी केलेल्या कारवाईतून माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ड्रग्ज तस्करीच्या अनुषंगाने शिरुर तालुक्यातील श्री.शादाब शेख याला ताब्यात घेतल्यानंतर त्याच्याकडून १ किलो ५१ ग्रॅम म्हणजेच सुमारे २ कोटी १० लाख रुपयांचे एमडी तसेच कुरुंद (ता.पारनेर) येथील श्री.ज्ञानेश्वर शिंदे याच्या घरातून तब्बल ९ किलो ६५५ ग्रॅम वजनाचे म्हणजेच सुमारे १९ कोटी ३९ लाख रुपये किमतीचे एमडी जप्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शिरूरच्या बाहयवळणावर पुणे पोलीसांनी स्थानिक पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईतून २ कोटी रुपयांचे एमडी तसेच कुरुंद व कोहोकडी येथील हमालवाडी (ता.पारनेर) तसेच हिंगणी (ता.श्रीगोंदे) येथील एका घरावर छापा टाकत सुमारे २० कोटी रुपयांचे एमडी जप्त करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध तसेच एमडी (मॅफेड्रोन) निर्मिती कारखाने चालवणारे, तस्कर यांचे विरोधात नार्कोटिक ड्रग्स आणि सायकोट्रॅापिक सबस्टान्सेस ॲक्ट, १९८५ (NDPS Act) च्या अनुषंगाने कारवाई करण्यासह ड्रग्स रॅकेट राज्यातून पूर्णतः संपविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) दि.१८.०१.२०२६ रोजी मौजे शिरुर गावाच्या हद्दीत बाबुरावनगर, ता.शिरुर, जि.पुणे येथे एका व्यक्तीच्या ताब्यात बेकायदेशीरपणे १ किलो ५२ ग्रॅम वजनाचा रु.२,१०,४०,०००/- किंमतीचा मेफेड्रॉन नावाचा अंमली पदार्थ मिळून आला.

सदर व्यक्तीने उपरोक्त अंमली पदार्थ हमालवाडी, कोहकडी, ता. पारनेर, जि.अहिल्यानगर येथे राहणाऱ्या अन्य एका व्यक्तीकडून विक्रीकरीता घेतल्याचे सांगितले. सबब, या दोन्ही व्यक्तींविरुद्ध शिरुर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गु.र.क्र.५३, एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ चे कलम ८(क), २२(क), २९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या पुढील तपासात एका व्यक्तीकडून एकूण ९ किलो ६५५ ग्रॅम वजनाचा रु.१९,३१,००,०००/ किंमतीचा मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ कुरुद,ता.पारनेर, जि. अहिल्यानगर येथून जप्त करण्यात आला आहे.

तसेच सदर गुन्ह्यात स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर येथे कार्यरत पोलीस हेड कॉन्स्टेबल रा.नेप्ती, ता.नगर जि.अहिल्यानगर यांचा व हिंगणी, ता.श्रीगोंदा, अहिल्यानगर येथे राहणाऱ्या एका व्यक्तीचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर गुन्ह्यातील तपासात नमूद मुद्देमाल हा या गुन्ह्यात सहभागी असलेल्या पोलीस हेड कॉन्स्टेबल कडूनच अन्य चार व्यक्तींना मिळाल्याचे दिसून आले. याबाबत अधिक चौकशी केली असता, गुन्ह्यातील आरोपी पोलीस हेड कॉन्स्टेबल याने सदर मुद्देमाल हा श्रीरामपूर शहर पोलीस ठाणे, जि. अहिल्यानगर गु.र.नं. ४९९/२०२५ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८(क), २२(क), २९ प्रमाणे दाखल गुन्ह्यातील त्याच्या ताब्यात असलेल्या जप्त मुद्देमालापैकी एक पांढरे रंगाचे गोणी मधील अल्प्राझोलम हा अंमली पदार्थ घेतला असल्याचे निष्पन्न झाले.

सदर गोणी मधून आरोपी पोलीस हेड कॉन्स्टेबल याने पांढरे रंगाचे स्फटीक असलेले १०.९७५ किलो ग्रॅम वजनाचे सुमारे रु.१,०९,७५,०००/- किंमतीचा अल्प्राझोलम काढून त्या ठिकाणी मैदा भरुन ठेवल्याचे निदर्शनास आले.

सद्य:स्थितीत सदर गुन्ह्यातील ५ आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत .

आरोपी पोलीस हेड कॉन्स्टेबल हा स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर येथे कार्यरत असताना त्याच्याकडे दि.१७.१२.२०२५ ते दि.१८.०१.२०२६ या कालावधी करीता केंद्रीय मुद्देमाल कक्ष, पोलीस मुख्यालय, अहिल्यानगर येथे एन.डी.पी.एस. मधील मुद्देमालाबाबतचे कामकाजाची जबाबदारी लेखी आदेशान्वये देण्यात आली होती.

तथापि, आरोपी पोलीस हेड कॉन्स्टेबल याने सदर अंमली पदार्थ स्वत:च्या आर्थिक फायद्याकरीता विकून अपहार केल्याबाबत त्याच्या विरुद्ध तोफखाना पोलीस स्टेशन, अहिल्यानगर येथे गु.र.नं.७६/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३१६(५),३१८(४) अन्वये दि.०७.०२.२०२६ रोजी स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांच्या दि.०७.०२.२०२६ रोजीच्या आदेशान्वये सदर गुन्ह्यात सहभाग असलेला पोलीस हेड कॉन्स्टेबल यास शासन सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. तसेच सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

(४) अंमली पदार्थ अंतर्गत कारवाई करण्यात आल्यानंतर सदर गुन्हयाचे तपासात Forward and Backward Link चा तपास करण्यात येत आहे. अंमली पदार्थ विरोधी कारवाई अधिक पारदर्शक करणेकरीता पोलीस विभागाकडून No Tolerance भूमिका राबविली जात आहे. त्याकरीता अंमली पदार्थ विषयक गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करण्याच्या सूचना दि.२२.०८.२०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व पोलीस घटकांना देण्यात आल्या आहेत.

सन २०२२ ते माहे नोव्हेंबर, २०२५ पर्यंत अंमली पदार्थ विषयक गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्या एकूण १० पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे निलंबन करण्यात आले असून, १५ पोलीस अधिकारी व अंमलदार यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी दि.३१.०८.२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली असून ANTF चे सर्व ७ युनिट्स कार्यान्वीत करण्यात आले आहेत.

सन २०२५ मध्ये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) व पोलीस घटकांमार्फत एकूण रु.५२३.१७ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ नष्ट करण्यात आले आहेत.

राज्यात सन २०२५ मध्ये अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतूक करणे संदर्भात एकूण ३६५९ गुन्हे दाखल झालेले असून ५३०७ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व एकूण रू.१३४०.४१ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत.

सन २०२५ मध्ये राज्यात अंमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहिम प्रभावीपणे व नियमीतपणे राबविण्यात आली आहे.

अवैध अंमली पदार्थ व्यापारातील संघटीत गुन्हेगारीस आळा घाळण्यासाठी महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम,१९९९ मध्ये सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ चे कलम (२) (दोन) अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार सदर कायद्या अंतर्गत राज्यात सन २०२५-२०२६ मध्ये एकूण १० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

राज्यात PITNDPS Act १९८८ (Prevention of Illicit Traffic in Narcotic Drugs and Psychotropic Substances Act) अंतर्गत सन २०२५ व २०२६ मध्ये एकूण ६ आरोपींना स्थानबद्ध करण्यात आले आहे.

तसेच परदेशात राहून त्यांचे हस्तकांमार्फत भारतामध्ये अंमली पदार्थांचे कारखाने चालवून अंमली पदार्थाची निर्मिती व विक्री करणाऱ्या एकूण ०४ आरोपींना प्रत्यार्पण करुन मुंबई पोलीसांनी अटक केली आहे.

त्याचप्रमाणे सन २०२५ मध्ये राज्यात पोलीस व इतर Drug Law Enforcement Agencies यांनी अंमली पदार्थ बनवणाऱ्या छुप्या ठिकाणांवर/कारखान्यांवर कारवाई (Clandestine Lab Bursting) करुन एकूण १४ गुन्हे दाखल केले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती शहरातील विशाला इन्फ्राकॉन प्रा.लि. या कंपनीने केलेला गैरव्यवहार**

**(२३) * ३०७६४ श्री.गजानन लवटे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरातील युनिफाय एनर्जी आणि विशाला इन्फ्राकॉन प्रा.लि. या कंपन्यांनी केंद्र शासनाच्या पंतप्रधान सुर्यघर योजनेच्या नावाखाली सोलर पॅनेल बसवून देण्याचे अमिष दाखवून रू.१६ हजार रोख तसेच बँक कर्जातून मिळालेल्या रू.१ लाख ८० हजार इतक्या रकमेचा गैरव्यवहार करण्यात आला असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराप्रकरणी गाडगेनगर पोलीस स्टेशन, अमरावती येथे वीज ग्राहकांनी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) विशाला इन्फ्राकॉन प्रा.लि. या नावाची कंपनी युनिफाय सोलार एनर्जी या ब्रँड नावाने कार्य करते. सदर कंपनीने फिर्यादी यांच्याकडून एकूण रु.२,२२,६००/- इतकी रक्कम घेऊन सोलार पॅनलचे काम केले नाही. म्हणून गाडगेनगर पोलीस स्टेशन येथे अप.क्र.६८/२०२६ दाखल करण्यात आला आहे. तसेच, इतर एका ग्राहकाकडून रु.१,३५,०००/- घेऊन सोलार पॅनल न बसविल्या कारणाने फ्रेजरपूरा पोलीस स्टेशन येथे अप.क्र.७२/२०२५ दाखल करण्यात आला आहे.

(२) पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर कार्यक्षेत्रांतर्गत सोलर पॅनल संबंधाने विशाला इन्फ्राकॉन प्रा.लि. या कंपनींविरुध्द ७ विज ग्राहकांनी पोलीस स्टेशन, गाडगेनगर येथे तक्रारी दाखल केल्या आहेत.
(३) कंपनीचे संचालकाविरुध्द पोलीस स्टेशन, गाडगेनगर येथे दि.१९.०१.२०२६ रोजी भादंवि कलम ४२०, ५०६ अन्वये अप.क्र.६८/२०२६ दाखल करण्यात आला असून सदर गुन्हा तपासाधीन आहे. तसेच, पोलीस स्टेशन, फ्रेजरपुरा येथे दि.२३.०१.२०२५ रोजी भा.न्या.सं. कलम ३१८(४), ३५१(२) अन्वये अप.क्रं. ७२/२०२५ असा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात दि.२४.०१.२०२६ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसई-विरार क्षेत्रासाठी (जि.पालघर) स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत**

**(२४) * २६९०५ श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील मिरा-भाईंदर-वसई-विरार आयुक्तालयाची स्थापना दिनांक १ ऑक्टोबर, २०२० रोजी झाली असून, त्याचा एक भाग असलेल्या वसई-विरार क्षेत्राचा ३११ चौ.किमी. विस्तार व सुमारे ३० लाख लोकसंख्येचा विचार करता एकाच आयुक्तालयावर अतिरिक्त प्रशासकीय ताण येत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आयुक्तालयासाठी मंजूर रुपये १३८ कोटी निधी व २,४८८ पदे ही दोन्ही शहरांच्या वाढत्या गुन्हेगारीच्या (विशेषतः महिलांवरील अत्याचार, भू-माफिया व सायबर गुन्हे) तुलनेत अत्यंत अपुरी असून, यामुळे ‘रिस्पॉन्स टाइम’मध्ये विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वसई-विरारची मोठी किनारपट्टी, सर्वात जास्त वेगाने वाढणारे शहर आणि औद्योगिक क्षेत्रासाठी स्वतंत्र सुरक्षा यंत्रणेची आवश्यकता पाहता, एक मोठी खाडी आणि दोन महसुली जिल्ह्यात विभागलेल्या या दोन स्वतंत्र महानगरातील अंतर तसेच एक महामार्ग व रेल्वे अशा मर्यादित जोडणीमुळे एकाच आयुक्तांमार्फत मनुष्यबळाची विभागणी करणे व प्रशासन चालवणे यात अडचणी येत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कायदा-सुव्यवस्था अधिक सुदृढ करण्यासाठी वसई-विरार क्षेत्रासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मिरा-भाईंदर-वसई-विरार आयुक्तालयाची स्थापना दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये झाली असून, सद्य:स्थितीत मिरा-भाईंदर-वसई-विरार आयुक्तालयांतर्गत एकूण ०३ पोलीस उप आयुक्त परिमंडळ कार्यालये असून, त्यापैकी वसई-विरार शहरांतर्गत ०२ पोलीस उप आयुक्त परिमंडळ कार्यालये व ०४ सहायक पोलीस आयुक्त कार्यालये तसेच १२ पोलीस ठाणी कार्यरत आहेत.

मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर मंजूर ४४१४ पदांपैकी ३४३६ पदे कार्यरत असून, रिक्त असलेल्या ९७८ पदांसाठी पोलीस भरती २०२४-२५ अंतर्गत पोलीस शिपाई-८४० पदे व चालक पोलीस शिपाई - ८१ पदे अशी एकूण ९२१ पदांची भरती दि.२०.२.२०२६ पासून सुरु झालेली आहे.

तसेच पोलीस भरती २०२१ अंतर्गत एकूण ९९६ पोलीस शिपाई व पोलीस भरती २०२२-२३ अंतर्गत एकूण २२३ पदे भरण्यात आलेली आहेत. सबब, पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील मनुष्यबळ समाधानकारक असल्याने प्रशासकीय ताण असल्याचे दिसून येत नाही. तसेच डायल ११२ चा सरासरी रिस्पॉन्स टाईम हा ०६ मि.५२ से. इतका असून, तो राज्याच्या सरासरी पेक्षा चांगला आहे.

(३) मिरा-भाईंदर व वसई-विरार या दोन महानगरांमध्ये वाहतुकीच्या दृष्टीने मेट्रो व रस्तेमार्ग प्रकल्पांची अंमलबजावणी सुरु आहे. तसेच समुद्रामार्गे रो-रो सेवा कार्यान्वीत होत आहे. सबब, या सर्व वाहतूक व्यवस्थेमुळे एकाच आयुक्तांमार्फत मनुष्यबळाची विभागणी करणे व प्रशासन चालवणे यात अडचणी येत नाहीत. त्यामुळे सद्य:स्थितीत वसई-विरार क्षेत्राकरिता स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याची आवश्यकता नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील हिंजवडी आय.टी. पार्कमध्ये फ्लाइनॉट सॉस प्रा. लि. कंपनीने विद्यार्थ्यांना नोकरीचे अमिष दाखवून फसवणूक केल्याबाबत

**(२५) * २७८६८ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील हिंजवडी आय.टी.पार्कमध्ये एका फसव्या कंपनीने सुमारे १००० नवीन पदवीधर विद्यार्थ्यांना नोकरी देण्याच्या नावाने प्रत्येकी रू.२ लाख इतके घेऊन कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर पिडीत उमेदवारांनी फोरम फॉर आयटी एम्प्लॉईज (FITE), महाराष्ट्र या संघटनेकडे मदत मागितली असून, पोलीस आयुक्त पिंपरी-चिंचवड प्रशासनाला दिलेल्या निवेदनाद्वारे विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करुन फसवणूक झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांनी दिलेली रक्कम परत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) फ्लाइनॉट सास. प्रा. लि. (Flynaut Saas Pvt. Ltd.) चे संचालक व इतर यांनी वेगेवगेळ्या कन्सलटन्सी मार्फत फिर्यादी तसेच इतर मुलांना मोठ्या वार्षीक पगाराचे आमिष दाखवून फिर्यादी व इतर मुलांना कंपनीच्या बँक खात्यावर १,००,०००/- ते २,५०,०००/- रुपये भरण्यास भाग पाडले. त्यानंतर, कंपनीच्या मेल वरुन नियुक्ती पत्र, पगार, ट्रेनिंग, पॅकेज याबाबत माहिती दिली. त्याचबरोबर गुगल मीट मार्फत २ ते ३ महिने वेगवेगळ्या ट्रेनर मार्फत ट्रेनिंग देवून त्यापैकी काही मुलांना काही महिन्यांचा पगार देण्यात आला. सदर ट्रेनिंग पूर्ण झाल्यानंतर सुमारे ७ ते ८ महिने ऑनलाईन काम करून घेण्यात आले, परंतु मुलांना पगार देण्यात आला नाही. पुढे पात्रता परीक्षा तसेच इंटरव्ह्यू नापास झाल्याची कारणे देऊन कंपनीत रुजू करुन घेतले नाही.

सदर प्रकरणी फ्लाइनॉट सास. प्रा. लि. (Flynaut Saas Pvt. Ltd.) चे संचालक व इतर यांच्या विरोधात हिंजवडी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड येथे पुढीलप्रमाणे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

अ) एका आय.टी फ्रेशर विद्यार्थ्याने दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक २३.०८.२०२५ रोजी भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२), ३१८(४), ३(५) अन्वये गु.र.क्रं ६०७/२०२५ नोंदविण्यात आला आहे.

ब) अन्य फिर्यादीच्या तक्रारीवरुन दिनाक ०१.०९.२०२५ रोजी भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२), ३१८(४), ३१६(५), ३(५) अन्वये गु.र.क्रं ६३८/२०२५ नोंदविण्यात आला आहे.

(२) व (३) फोरम फॉर आयटी एम्प्लॉइज (FITE) यांनी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांना सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी SIT स्थापन करण्याबाबत विनंती केली होती. त्याअनुषंगाने, सदर गुन्ह्याचा सखोल, नि:पक्षपाती व पारदर्शक तपासाच्या दृष्टीने पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांच्या दिनांक २३.०२.२०२६ रोजीच्या आदेशान्वये पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०२, पिंपरी चिंचवड यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्यात आले आहे.

उपरोक्त नमूद गुन्ह्यांत अद्यापपर्यंत एकूण ३५७ पीडितांची एकूण ६,४९,९६,७३१/- रुपये रकमेची फसवणूक झाल्याचे निर्दशनास आले आहे. सदर गुन्ह्यांतील २ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुद्ध मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. इतर २ आरोपींच्या अटकपूर्व जामीन अर्जावर मा.उच्च न्यायालयात सुणावणी प्रलंबित असून मा.न्यायालयाने No Coercive Action Till Next Date असे आदेश दिले आहेत.

सदर गुन्हयातील आरोपी फ्लायनॅाट सास. कंपनीचे स्थापक व कार्यरत एक कर्मचारी यांच्याकडून रुपये ४८,२५,७८०/- किंमतीची जंगम मालमत्ता व रुपये ७९,००,०००/- किंमतीची स्थावर मालमत्ता असे एकूण १,२७,२५,७८०/- रुपये किंमतीची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. तसेच फसवणुकीच्या रक्कमेतून घेतलेल्या स्थावर मालमत्तेबाबत पुढील कायदेशीर कारवाई चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळामार्फत (एसटी) १३१० बस गाडया भाडेतत्वावर खरेदी करण्याच्या प्रक्रियेत झालेली अनियमितता

**(२६) * २३३६२ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळामध्ये १३१० बसेस भाडेतत्त्वावर घेण्यासाठी काढण्यात आलेली निविदा प्रक्रिया दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी रद्द करण्यात आल्याने सदर प्रकरणी चौकशी अद्याप पूर्ण झालेली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रिया कोणत्या कारणांमुळे रद्द करण्यात आली व निविदा रद्द करण्यासंदर्भात सुरू असलेली चौकशी कोणत्या प्राधिकरणामार्फत करण्यात येत असून चौकशीचा कार्यक्षेत्र व उद्देश काय आहे तसेच सदर चौकशी अद्याप अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १३१० बसेस भाडेतत्त्वावर न मिळाल्यामुळे राज्य परिवहन महामंडळाच्या बससेवा, प्रवाशांची गैरसोय व उत्पन्नावर विपरीत परिणाम झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी कालबद्ध पध्दतीने पूर्ण करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह राज्य परिवहन महामंडळासाठी आवश्यक बसेस तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) व (२) होय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळामध्ये १३१० बसेसच्या संपूर्ण निविदा प्रक्रियेबाबत अनियमितता झाल्याची तक्रार प्राप्त झाल्याने चौकशी करुन सदरची निविदा प्रक्रिया दि.२१/०१/२०२५ रोजी रद्द करण्यात आली आहे. सदर प्रकरणी शासन स्तरावर चौकशी सुरु आहे.

(३), (४) व (५) रा. प. महामंडळात स्वमालकीच्या २६४० साध्या बसेस पैकी २५२४ बसेस प्राप्त झाल्या असून उर्वीरित ११६ बसेस माहे मार्च, २०२६ पर्यंत प्राप्त होतील. तसेच भविष्यात स्वमालकीच्या ३००० साध्या बसेस घेणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**राज्यात ओला, उबेर, रॅपिडो, किंग ड्राईव्ह इत्यादी कंपन्यांना अधिकृत एग्रीगेटर लायसन्स अथवा बाईक टॅक्सी सेवा चालविण्याच्या परवानगी देण्याबाबत**

**(२७) * २५३३४ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह संपूर्ण राज्यात केवळ इलेक्ट्रीक बाईक टॅक्सी सेवेसाठीच परिवहन विभागाकडून परवानगी देण्यात आलेली असताना ओला, उबेर, रॅपिडो, किंग ड्राईव्ह इत्यादी कंपन्यांना अद्याप अधिकृत एग्रीगेटर लायसन्स अथवा बाईक टॅक्सी सेवा चालविण्याची परवानगी देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई, मुंबई उपनगर तसेच पनवेल, बदलापूर ते विरार या संपूर्ण महानगर परिसरात परवानगी नसतानाही सदर बाईक टॅक्सी सेवा अनधिकृतपणे व राजरोसपणे सुरू असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बाईक टॅक्सी वाहने इलेक्ट्रीक नसून पेट्रोलवर चालत असल्याचे तसेच, या कंपन्यांच्या वाहनचालकांविरुद्ध प्रवाशांकडून तक्रारी वाढत असल्याचे काही वाहनचालकांकडे वैध वाहनचालक परवाना नसल्याचे तसेच काहींवर गुन्हेगारी स्वरूपाचे गुन्हे दाखल केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सर्व कंपनीच्या वाहनचालकांची नियम व सूचनांचे उल्लंघन करून अनधिकृतपणे बाईक टॅक्सी सेवा सुरू ठेवणाऱ्या संबंधित कंपन्या व वाहनचालकांविरुद्ध मुंबईतील लोकप्रतिनिधींनी प्रवाशांच्या सुरक्षिततेस धोका निर्माण होत असल्याची लेखी तक्रार मा.परिवहन मंत्री यांच्याकडे दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अवैध सेवा बंद करण्यासह संबंधित रॅपिडो बाईक टॅक्सी मालकावर कारवाई करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) महाराष्ट्र राज्यातील १ लाख पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरामध्ये बाईक टॅक्सी सुरु करण्यास दिनांक २१.०४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

मुंबई महानगर क्षेत्राकरीता १) मे.उबेर इंडिया सिस्टीम प्रा.लि., २) मे.रोपेन ट्रान्सपोर्टेशन सव्हिसेस प्रा.लि., व ३) मे.ॲनी टेक्नोलॉजीसेस प्रा.लि. यांना ३० दिवसाकरीता तात्पुरता परवाना (Provisional Licence) जारी करण्यास राज्य परिवहन प्राधिकरणाने दिनांक १८.०८.२०२५ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.१५/२०२५ अन्वये मान्यता दिली आहे.

(२), (३), (४) व (५) महाराष्ट्र बाईक - टॅक्सी नियम-२०२५ मधील तरतुदीनुसार बाईक-टॅक्सी १०० टक्के इलेक्ट्रिक असणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियम, २०२५ तरतुदीचे उल्लंघन करतांना आढळून आलेल्या वाहनांवर कडक कार्यवाही करण्याचे आदेश सर्व प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांना देण्यात आले आहेत. तसेच लोकप्रतिनिधींनी प्रवाशांच्या सुरक्षिततेस धोका निर्माण होत असल्याबाबत केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत राज्यातील वायुवेग पथकांना सूचना देण्यात आल्या असून वायुवेग पथकामार्फत वाहनांची तपासणी करण्यात आल्यानंतर दोषी आढळून आलेल्या वाहनांवर व दंडात्मक कार्यवाही करण्यात येत आहे.

माहे एप्रिल, २०२५ पासून एकूण-९३० दुचाकींवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून रू.२३,९२,७५०/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियम, २०२५ तरतुदींची अंमलबजावणी न करणाऱ्या कंपन्यांविरुध्द विविध पोलीस स्थानकांत २० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हिंगणा एमआयडीसीतील (जि.नागपूर) अदाणी मिक्सर प्लांटमधील ट्रक चालकाच्या निष्काळजीपणामुळे एका व्यक्तीचा बळी गेल्याबाबत**

**(२८) * २८७१९ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील हिंगणा एमआयडीसीतील अदाणी मिक्सर प्लांटने पर्यावरण विभागाच्या नियमाचे उल्लंघन केल्याने दिनांक १३ जानेवारी, २०२६ रोजी बंद करण्यात आला असतांना देखील उक्त एमआयडीसीतील कॉक्रीट मिक्सर ट्रकने पोलीस स्टेशनमधील श्री.मधुकर नामदेव गोतमारे यांचा बळी घेतला असल्याचे दिनांक २८ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणातील कॉक्रीट मिक्सर चा चालक फरार असून कंपनीला पाठीशी घालण्याच्या उदेशाने अज्ञात व्यक्ती विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर जिल्ह्यातील हिंगणा एमआयडीसी येथील अदाणी मिक्सर प्लांटने पर्यावरण विभागाच्या नियमांचे उल्लंघन केल्यामुळे दिनांक १३ जानेवारी, २०२६ रोजी प्लांट बंद करण्यात आला होता. तथापि, सदर प्लांटमध्ये काँक्रीट निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्याचा दीर्घकाळ वापर न झाल्यास संबंधित यंत्रसामग्री खराब होण्याची शक्यता तसेच साठवलेल्या साहित्यामुळे अपघाताचा धोका निर्माण होऊ नये आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी घालून दिलेल्या नवीन नियमांची पूर्तता करण्यासाठी प्लांट मर्यादित स्वरूपात तात्पुरता सुरू ठेवण्यात आला होता. सदर प्लाँट दि.२७.०१.२०२६ रोजी पासून बंद करण्यात आला आहे, असे सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी दिनांक २६.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

सिमेंन्ट मिक्सर ट्रक चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून दुचाकी चालक दैनिक भास्कर प्रेसमध्ये त्यांच्या मजुरीच्या कामावर जात असताना धडक देऊन त्यास गंभीर जखमी केले. यामुळे सदर दुचाकी चालकाचा दि. २७.०१.२०२६ रोजी मृत्यू झाला.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी एम.आई.डी.सी.पोलीस ठाणे, नागपूर शहर येथे दिनांक २७.०१.२०२६ रोजी भारतीय न्याय संहिता कलम २८१, १०६(१) सह मोटारवाहन अधिनियम कलम १८४, १८७ अन्वये अप.क्रं. ६६/२०२६ नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपी ट्रक चालकाला दिनांक २९.०१.२०२६ रोजी एम.आई.डी.सी.पोलीस ठाणे, नागपूर शहर येथे ताब्यात घेण्यात आले होते. सदर प्रकरणी आरोपीस सूचनापत्र देण्यात आलेले आहे. सदर घटनेचा तपास सुरु असून मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करणे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## समुद्राळ (ता.उमरगा, जि.धाराशिव) येथील ऊसतोड मजूर कामगाराचा झालेला मृत्यू

**(२९) * ३०६८३ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समुद्राळ (ता.उमरगा, जि.धाराशिव) गावातील साखर कारखाना परिसरात झालेल्या अपघातात एका ऊसतोड कामगाराचा मृत्यू व दोन कामगार जखमी झाले असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपघाताबाबत लोहारा पोलीस ठाण्यात कलम ३०४अ, २७९, ३३८ इ. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणातील आरोपीस अटक टाळण्यासाठी पोलीस हवालदार, श्री.ढवन यांनी दीड लाख रुपयांची लाच मागितली असून, दलालामार्फत ७० हजार रुपये स्वीकारण्यात आले असल्याचे प्राप्त झालेल्या चित्रफितीच्या माध्यमातून प्रसिद्ध झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणातील दलालीमध्ये सास्तूर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचाचा सहभाग असल्याचे आरोप करण्यात आला असून, ग्रामपंचायतीच्या नवनिर्वाचित प्रतिनिधींनी अशा गुन्हेगारी व भ्रष्ट कारवायांमध्ये सहभागी होणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याने उक्त प्रकरणी ग्रामविकास विभागाकडून स्वतंत्र तपासाचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ऊसतोड मजूर कामगाराच्या मृत्यू प्रकरणात तपास अधिकारी यांना पाठीशी घालणाऱ्या उपविभागीय अधिकारी व पोलिस निरीक्षक यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ०३.०१.२०२६ रोजी समुद्राळ गावाशेजारील भाऊसाहेब बिराजदार क्युनर्जी साखर कारखाना परिसरात महिंद्रा ट्रॅक्टर नंबर MH २४ BR ७९०८ या वाहनाच्या चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रक्टर निष्काळजीपणाने चालवून महिंद्रा कंपनीच्या मिनी ट्रॅक्टरला जोडलेल्या एका बैलगाडीस जोराची धडक दिल्यामुळे एका उसतोड कामगाराचा मृत्यू झाला असुन दोन ऊसतोड मजुर जखमी झालेले आहेत.

(२) उपरोक्त घटनेबाबत पोलीस स्टेशन, लोहारा येथे गु.र.नं. ०२/२०२६, भा.न्या.सं २०२३ चे कलम १०६(१), २८१, १२५(a), सह मोटारवाहन अधिनियम १९८८ चे कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) व (४) सदरचा गुन्हा हा जामीनपात्र असून त्यात ७ वर्षापेक्षा कमी शिक्षा आहे. त्यामुळे सदर आरोपीस मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अर्नेशकुमार विरुध्द बिहार राज्य या निर्णयाच्या आधारे सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक न करता त्यास BNSS कलम ३५(३) प्रमाणे नोटीस दिलेली आहे.

तसेच सदर प्रकरणामध्ये आरोपीची अटक टाळण्यासाठी पोलीस हवालदार यांनी लाच घेतल्याबाबत प्रसिध्द झाल्याच्या व्हिडीओच्या संबंधाने उपविभागीय पोलीस अधिकारी, धाराशिव यांना चौकशी करुन चौकशी अहवाल सादर करण्याबाबत पोलीस अधिक्षक यांनी दिनांक ०९.०२.२०२६ रोजीच्या आदेशान्वये आदेशीत केले आहे. सद्यस्थितीत सदर प्रकरण तपासाधिन आहे.

सदर प्रकरणी दाखल गुन्ह्यातील प्रथम खबरी अहवालात सास्तुर ग्रामपंचायतीच्या उपसंरपंचाच्या नावाचा समावेश नाही. तथापि, सदरच्या दोन्ही घटनांबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी, धाराशिव यांच्याकडून अद्याप चौकशी सुरु असल्याने चौकशी संपेपर्यंत याबाबत भाष्य करता येणार नाही.

(५) सदर प्रकरणाची चौकशी पोलीस अधिक्षक, धाराशिव यांच्या दिनांक ०९.०२.२०२६ च्या आदेशान्वये उपविभागीय पोलीस अधिकारी, धाराशिव यांचेकडे देण्यात आली आहे. सद्यस्थितीत सदर प्रकरण चौकशीवर प्रलंबित आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**तारापूर (जि.पालघर) येथील औद्योगिक वसाहतीतील**
**कारखान्यांमुळे प्रदूषणात वाढ झाल्याबाबत**

**(३०) * २६०५२ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी (पूर्व) :**
सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) येथील औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमधून रासायनिक सांडपाणी, औषधनिर्माण, रंग, प्लास्टिक अन्य अवजड उद्योगांमधून उत्सर्जित होणारा धूर, कारखान्यांमधून निघणारा विषारी वायू, रस्त्यावरील धुळी इत्यादीमुळे प्रदूषणात वाढ झाल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून दुर्गंधी, डोळयांची जळजळ, श्वसनास त्रास, सतत खोकला, डोकेदुखी, मळमळ यासारख्या तक्रारींमध्ये वाढ झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सदर एमआयडीसीमध्ये गेल्या काही वर्षात गॅस गळतीच्या ५ मोठ्या घटना घडल्या असून यामध्ये ७ जणांचा मृत्यू तर अनेक जण जखमी असून वायू, जल व भूमी प्रदुषणामुळे शेती, पिण्याचे पाणी व पर्यावरणावर गंभीर परिणाम होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, औद्योगिक वसाहतीतील रासायनिक सांडपाणी व घनकचऱ्याची अयोग्य विल्हेवाट तसेच हरितपट्ट्यांची सर्रास विक्री यामुळे पर्यावरणाचा समतोल धोक्यात आला असल्याने हरित लवादाने संबंधित प्रकरणात सुमारे ३६० कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कारखान्यांतून निघणाऱ्या टाकाऊ औद्योगिक कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली जात नसल्याने भंगार व्यावसायिकांकडून त्या कचऱ्याची मोठ्या प्रमाणात बेकायदा साठवणूक केली जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक नागरीकांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे वारंवार तक्रारी देऊनही अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन औद्योगिक कारखान्यांमुळे होणारे प्रदूषण रोखण्यासह संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्या दिनांक २३/०२/२०२६ रोजीच्या अहवालानुसार तारापूर औद्योगिक वसाहत क्षेत्रामध्ये रूग्णांच्या प्रमाणात लक्षणिय वाढ झाल्याचे दिसून येत नाही. तसेच आढळलेले रूग्ण हे संबंधित कारणाने आजारी झाले हे निश्चित सांगता येत नाही, असे नमूद करण्यात आले आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार माहे जानेवारी, २०२४ ते माहे फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत तारापूर औद्योगिक वसाहतीतील उद्योगांमध्ये आगीच्या अथवा वायू गळतीबाबत जवळपास दहा घटना निदर्शनास आल्या त्यापैकी सात घटना या आगीमुळे, एक घटना रसायन गळतीमुळे व दोन घटना वायू

गळतीमुळे घडलेल्या आहेत. त्यामध्ये मे.मेडली फार्मास्युटीकल्स लि. या उद्योगाच्या उत्पादन प्रक्रियेदरम्यान वायू गळती झाल्याने चार जणांचा मृत्यु व दोन जण जखमी झाले होते. तसेच अन्य एका प्रकरणी मे.आरती ड्रग्ज लि. या कंपनीत वायू गळती झाली होती. तथापि, सदर कंपनीने तात्काळ उपाययोजना करून वायू गळती नियंत्रणात आणली असून त्यामध्ये कोणीही जखमी अथवा जिवीत हानी झाली नाही.

उपरोक्त अपघाती घटनांव्यतिरिक्त वायू, जल व भूमी प्रदूषणामुळे शेती, पिण्याचे पाणी व पर्यावरणावर गंभीर परिणाम होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली नसल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी कळविले आहे.

(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या तारापूर औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमधून निर्माण होणारे सांडपाणी उद्योग निहाय प्राथमिक, व्दितीय व तृतीय स्वरुपाच्या प्रक्रियेनंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भुयारी गटारीद्वारे औद्योगिक क्षेत्रातील तीन वेगवेगळया ठिकाणी असणाऱ्या सम्पमध्ये गोळा केले जाते. तद्नंतर सदर सांडपाणी पंपिंग तसेच गुरुत्वाकर्षण वाहिनीद्वारे सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रात प्रकियेकरिता नेण्यात येते. सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रात प्रक्रिया केल्यानंतर प्रक्रियाकृत सांडपाणी राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेने निर्धारीत केल्या प्रमाणे अरबी समुद्रात समुद्र किनाऱ्यापासून ७.१ कि.मी अंतरावर सोडण्यात येते.

कारखान्यातून निर्माण होणाऱ्या टाकाऊ रासायनिक पदार्थांची हाताळणी व विल्हेवाटीसंबंधी नियमावली केंद्र शासनामार्फत निश्चित करण्यात आलेली आहे. अशा पदार्थांची साठवणूक, वाहतूक, प्रक्रिया व विल्हेवाट योग्यरित्या व्हावी या दृष्टीने तळोजा येथे सामुहिक प्रक्रिया सयंत्रणा कार्यान्वित आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने उद्योगांना दिलेल्या संमतीपत्रातील अटींनुसार तारापूर औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यातून निर्माण होणारा घनकचरा या सयंत्रणेकडे नियमितपणे पाठविणे बंधनकारक आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या अहवालानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंळामार्फत हरित पट्ट्यांची सर्रास विक्री केली जात नाही. तथापि, उद्योगांकडून मागणी आल्यास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील खुल्या जागांचे वृक्षारोपण/ बागबगिचा/ सुशोभिकरणाकरिता पाच वर्षांच्या कालावधीसाठी कोणत्याही प्रकारचे पक्के बांधकाम अनुज्ञेय न करण्याच्या अटीवर नाममात्र भूभाडे आकारून वाटप केले जाते.

मा.राष्ट्रीय हरित लवाद येथे दाखल मूळ अर्ज ६४/२०१६ या प्रकरणी मा.लवादामार्फत तारापूर औद्योगिक वसाहतीतील प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या उद्योगांना एकूण रु.१६० कोटी इतका दंड आकारण्यात आला होता. तद्नंतर मा.राष्ट्रीय हरित लवादाच्या दि.२४.०१.२०२२ रोजीच्या अंतिम निर्देशांनुसार सदर दंडाची वाढवून रू.२७९.०८ कोटी इतकी करण्यात आली होती. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाने सदरहू प्रकरणात सिवील अपील डायरी नं.८४२७/२०२२ (मे.आरती ड्रग्ज विरुध्द महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व इतर) या प्रकरणी दि.०३.०६.२०२२ रोजी मा. राष्ट्रीय हरित लवादाने मूळ अर्ज क्र.६४/२०१६ या प्रकरणी दिलेल्या आदेशास स्थगिती दिलेली असून सद्यस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) व (५) हे खरे नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांना देण्यात येणाऱ्या संमतीपत्रातील अटींनुसार तारापूर औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांमधून निर्माण होणारा घनकचरा तळोजा येथे सामुहिक प्रक्रिया व विल्हेवाट सयंत्रणेकडे नियमितपणे पाठविणे बंधनकारक असून तो नियमितपणे पाठविण्यात येतो. तसेच संमतीपत्रातील अटींचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दोषी आढळणाऱ्या उद्योगांविरूद्ध नियमांनुसार कारवाई करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यात गोवंश हत्या, वाहतूक, विक्री आणि अवैध व्यापारावर बंदी असतांना हत्या व तस्करी होत असल्याबाबत

**(३१) * २६८०६ श्री.निलेश राणे (कुडाळ), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कायद्यानुसार संपूर्ण राज्यात गोवंश हत्या, वाहतूक, विक्री आणि अवैध व्यापारावर बंदी असतानादेखील अनेक ठिकाणी घरांमध्ये अथवा गुप्त ठिकाणी गोवंश कत्तल सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील विलेपार्ले (पश्चिम) येथील प्रेमनगर परिसरात दिनांक २८ जानेवारी, २०२६ रोजी गोमांसाची वाहतूक केल्याबद्दल गोरक्षकांनी श्री. खलील सलाउद्दीन कुरेशी या व्यक्तीच्या विरोधात जुहू पोलिस स्टेशन येथे तक्रार दाखल करून अटक करण्यात आली असता सदरहू तक्रारीतील कलम जामीन पात्र असल्यामुळे त्याला त्वरीत जामीन मिळाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मुंबई–आग्रा महामार्गावर पिंपळगाव बसवंतजवळ शिरवाडे फाटा येथे ५७ गायींची तस्करी करणाऱ्या टेम्पोला गोरक्षकांनी पाठलाग करुन पकडले असता गुरांना निदर्यपणे दोरीने बांधून ठेवण्यात आल्याने संतप्त झालेल्या नागरिकांनी मुंबई-आग्रा महामार्ग रोखून धरल्याने सुमारे तीन तास वाहतूक विस्कळीत झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच राजापूर (जि.रत्नागिरी) मधील पाचलमध्ये जनावरे वाहतूकीचा कोणताही परवाना किंवा पशुवैदयकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र नसताना गुरांची अवैध वाहतूक करणाऱ्या दोघांना अटक केली असता त्यांच्याकडून १३ जनावरांसह १२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याचे दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध गोवंश हत्या आणि तस्करी केल्याबाबत माकोका कायद्याअंतर्गत कारवाई करण्यासह अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कायद्यानुसार गोवंश हत्या संबंधित माहे जानेवारी २०२६ मध्ये १०४ गुन्हे दाखल असून १८७ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे

(२) दिनांक २८ जानेवारी, २०२६ रोजी सकाळी ०६.०० वा. च्या सुमारास इसम नामे खलील सलाउद्दीन कुरेशी व सलमान अब्दुलवहीद कुरेशी यांना कुणाल मोटर्स, एसव्ही रोड, विलेपार्ले (प.) मुंबई ते प्रेमनगर यादरम्यान विनापरवाना जनावराचे मांस घेवून जाताना पकडण्यात आले. सदरचे मांस हे गाय, बैल किंवा वळू किंवा शासनाने जाहीर केलेल्या अनुसुचीतील प्राण्यांपैकी असल्याने, फिर्यादी यांनी नमुद इसमांविरूध्द कायदेशीर तक्रार दिल्याने जुहू पोलीस ठाणे येथे वि.स्था गु.र. क ०७/२०२६ कलम ५ (क) सह ९ (अ) महाराष्ट्र पशु संरक्षण अधि. १९७६ (सी.सी.टी.एन. एस क्रमांक १०४/२०२५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील २ आरोपींना अटक करण्यात आली असून, मा.न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केलेला आहे.

(३) पिंपळगाव (ब.) पोलीस स्टेशन हद्दीत दि.८ जानेवारी, २०२६ सकाळी ०९:०० वाजेच्या सुमारास जंगम पेट्रोलपंप समोर पाचोरे-वणी शिवार मुंबई आग्रा महामार्ग येथे ८ ते १० गोरक्षकांनी गोवंश वाहतुक करणारी गाडी पकडली होती. सदर गाडीत कत्तलीसाठी जाणारे गोवंश जातीचे एकूण ४७ गोवंश कोंबून भरून वाहतुक केली जात होती. त्यावेळी गोरक्षकांनी जंगम पेट्रोल पंपासमोर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन सुरू केले होते. त्यानंतर ११:२० वाजता रास्ता रोको आंदोलन मागे घेवून वाहतुक सुरळीत करण्यात आली.

सदर प्रकरणी पिंपळगाव (ब.) पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ०६/२०२६ प्रमाणे दि. ०८/०१/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) सदर घटनेच्या अनुषंगाने राजापुर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. १७९/२०२५ प्रमाणे दि.२३/०९/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यात ०२ बैल, ११ गाय, १ वासरु असे एकूण १३ जनावरे व वाहन असे एकूण १२,०५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

(५) व (६) अ) जुहू पोलीस ठाणे येथे वि.स्था गु.र.क्र. ०७/२०२६ कलम ५ (क) सह ९ (अ) महाराष्ट्र पशु संरक्षण अधि. १९७६ (सी.सी.टी.एन. एस क्रमांक १०४/२०२५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील २ आरोपींना अटक करण्यात आली असून मा.न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केलेला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

ब) पिंपळगाव (ब.) पोलीस ठाणे येथे गुरनं ०६/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३२५, २९९ सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५, ५ (अ), ९ (अ), ११ व प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम कलम ११, ११(१) (ड), ११(१) (ई), ११(१) (एच), ११(१) (एम) तसेच मोटार वाहन कायदा कलम ६६, १९२, १८४ प्रमाणे दि. ०८/०१/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपींना अटक करून कोर्टात हजर केले असता मा.न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केलेला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

क) राजापुर पोलीस ठाणे येथे राजापुर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. १७९/२०२५ प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंधक करण्याबाबत अधि. १९६० चे कलम ११ (१), ११(१) (h), ११(१) (d), ११(३) (८), तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधि. १९७६ चे कलम ५ (a), ५ (b), ९, प्राण्यांचे परीवहन नियम १९७८ चे कलम ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५४, ५६ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ११९, मो.वा.का.क ६६/१९२, भारतीय न्याय संहीता २०२३ चे क. ३ (५) प्रमाणे दि. २३/०९/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयातील ०२ आरोपींना दि. २३/०९/२०२५ रोजी अटक करण्यात आलेली आहे. तसेच एका अरोपीस मा.सत्र न्यायालय, रत्नागिरी यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केलेला आहे. सदर गुन्ह्यातील ०३ आरोपींविरूद्ध दि.१७/११/२०२५ रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

गोवंश हत्या आणि तस्करी केल्याबाबत महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (MCOCA) कायद्याअंतर्गत सन २०२५ मध्ये ४ गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण २२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

-----------------

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटी बस अपघातांमध्ये वाढ झाल्याबाबत**

**(३२) * २९३३० श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात 'शून्य अपघात धोरण' लागू असतानाही सन २०१८–१९ ते माहे नोव्हेंबर २०२५ या कालावधीत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसचे २,५४६ प्राणांतिक व १०,९६० गंभीर अपघात झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटी बस अपघातांमध्ये प्रवासी २६८, एसटी कर्मचारी ६५, पादचारी ९५० व इतर १,४८० असे एकूण २७६३ नागरिकांचा मृत्यू झाला असून याबाबत शासनाकडे तपशीलवार नोंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १५ वर्षांपेक्षा जुनी व खराब वाहने, तांत्रिक बिघाड, चालकांचे अपुरे प्रशिक्षण व खराब रस्ते ही एसटी अपघातांची प्रमुख कारणे असून सन २०१८–१९ पासून आजपर्यंत अपघातांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नव्या लालपरी बस खरेदी करण्यासह चालक प्रशिक्षणासाठी शासनाकडून विशेष योजना राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन एसटी महामंडळाच्या बसचे अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) व (२) सन २०१८-१९ ते माहे नोव्हेंबर २०२५ या कालावधीत रा.प. महामंडळाच्या बसचे प्राणांतिक अपघात प्रकारातील १८८४ व गंभीर अपघात प्रकारातील ८६२१ अपघात झाले आहेत.

सन २०१८-१९ ते नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत रा.प. बसच्या झालेल्या अपघातात १९९ रा.प. प्रवासी, ५६ रा.प. कर्मचारी, ४९४ पादचारी गटातील व इतर १५२४ असे एकूण २२७३ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.

(३) जुनी व खराब वाहने, तांत्रिक बिघाड, चालकांचे अपुरे प्रशिक्षण व खराब रस्ते ही अपघाताची प्रमुख कारणे नाहीत.

(४) रा.प.महामंडळामार्फत नव्याने ३००० तसेच ५००० नवीन साधी तयार वाहने खरेदी करण्यात येणार आहेत.

(५) व (६) रा.प.महामंडळाकडून अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी नियमितपणे चालकांना प्रशिक्षण दिले जाते.

-----------------

## मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर इंधन चोरी व गुन्हेगारी प्रकार रोखण्यासाठी सुरक्षाव्यवस्था कार्यान्वित करण्याबाबत

**(३३) * २३५२८ श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर पहाटे सुमारास गस्त घालत असताना डिझेल चोरी करणाऱ्या टोळीने पोलिसांच्या वाहनावर केलेल्या दगडफेकीत पोलिसांना दुखापत झाल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समृद्धी महामार्गावर इंधन चोरीसारख्या गुन्ह्यांमध्ये सुरक्षेतील त्रुटी, अपुरी पोलीस व्यवस्था, सी.सी.टी.व्ही. व तांत्रिक साधनांचा अभाव किंवा समन्वयातील कमतरता यांमुळे यापूर्वीही डिझेल व इंधन चोरीचे प्रकार वारंवार घडले असून अशा घटनांदरम्यान वाहनचालक, वाहतूकदार व पोलिस कर्मचाऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने समृद्धी महामार्गावर इंधन चोरी व गुन्हेगारी रोखण्यासाठी विशेष पोलीस पथके, गस्त व्यवस्था, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे, ड्रोन अथवा अन्य आधुनिक सुरक्षा व्यवस्था कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाशिक जिल्ह्यामध्ये सिन्नर पोलीस स्टेशन हद्दीत हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गावर दिनांक ५ जानेवारी, २०२६ रोजी डिझेल चोरी करणाऱ्या टोळीने पोलीसांच्या वाहनावर दगडफेक केल्याची घटना घडलेली आहे.

सदरच्या घटनेमध्ये पोलीसाच्या वाहनाचे नुकसान झाले,परंतु पोलीसांना दुखापत झालेली नाही.

(२) यापूर्वी समृध्दी महामार्गावर रात्रीचे वेळी डिझेल चोरीच्या घटना पोलीस मदत केंद्र छत्रपती संभाजीनगर आणि जालना यांच्या हद्दीत घडलेल्या असून त्याबाबत संबंधित पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

इंधन चोरी व इतर प्रकारचे गुन्हे घडू नयेत म्हणून महामार्ग पोलीसांकडून गस्ती पथके नेमून समृध्दी महामार्गावर नियमीतपणे प्रभावी गस्त करण्यात येते.

(३) नाशिक ग्रामीण पोलीस अंतर्गत सिन्नर पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने सिन्नर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ०४/२०२६ नुसार दिनांक ५ जानेवारी, २०२६ रोजी कलम ३०९ (४), १२५, ३२४ (४), ३ (५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(४) समृध्दी महामार्गावर सुरक्षाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१) समृध्दी महामार्गावर महामार्ग पोलीस विभागाकडून नियमितपणे पेट्रोलिंग वाहने कार्यान्वित करण्यात आलेली आहेत.

२) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून समृध्दी महामार्गावर पेट्रोलिंग करिता १५ महिंद्रा स्कॉर्पिओ वाहने पुरविण्यात आलेली आहेत.

३) ठाणे परिक्षेत्रात प्रवेश करताना आणि बाहेर पडताना इंटरचेंज या ठिकाणी सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

४) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून समृध्दी महामार्गावर इंटेलिजेंट ट्रान्सपोर्टेशन सिस्टीम (ITS) यंत्रणा उभारण्यात येत आहे. सदरच्या प्रणाली अंतर्गत खालीलप्रमाणे कामे प्रस्तावित आहेत :-

i) देखरेखीचे उपकरणे उदा. पीटीझेड कॅमेरे आणि आपत्तकालीन बॉक्स प्रत्येक एक किलोमीटर अंतरावर बसविण्यात येत आहेत.

ii) प्रत्येक १०० कि.मी.अंतरावर वाहतूक व्यवस्थापन केंद्रे बांधकामाधीन आहेत. या केंद्रांमध्ये नियुक्त कर्मचारी २४x७ त्यांच्या कार्यक्षेत्रातील महामार्गाचे निरीक्षण करतील.

iii) अतिरिक्त देखरेख उपाय म्हणून प्रत्येक वाहतूक व्यवस्थापन केंद्रावर सीसीटीव्हीसह ड्रोन उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील वायू प्रदूषणात वाढ झाल्याबाबत

**(३४) * ३०२७४ श्री.महेश (दादा) किसन लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व पिंपरी-चिंचवड, हिंजवडी आयटी पार्क, वाकड व औद्योगिक पट्ट्यांमध्ये हवेची गुणवत्ता खालावली असून काही भागात हवा गुणवत्ता निर्देशांक (AQI) २०० च्या पुढे गेल्याची माहिती माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वायू प्रदूषणामुळे नागरिकांना अस्थमा, सीओपीडी व इतर फुफ्फुसांच्या विकारांचा मोठा त्रास सहन करावा लागत असून श्वसनाच्या रुग्णांच्या संख्येत भर पडत असल्याने सन २०२१-२२ मध्ये १ हजार ३०९ असलेले रुग्ण सन २०२२-२३ मध्ये २ हजार ३२१ पर्यंत पोहोचले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजना पुरेशा नसून वायू प्रदूषण कमी करण्याच्या नियमांचे उघडपणे उल्लंघन होत असल्यामुळे हिंजवडी येथील आयटी कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रदूषण करणाऱ्या आरएमसी प्लांटवर कारवाई करण्याची मागणी झाल्यानंतर केवळ दोन प्लांट सील करण्यात आले असून इतर प्रदूषणकारी घटकांवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रदूषण रोखण्यासाठी व नागरिकांचे आरोग्य जपण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि, पिंपरी चिंचवड मनपाच्या दि.०२/०३/२०२६ रोजीच्या अहवालानुसार सन २०२२-२०२३ मध्ये रुग्ण संख्या सन २०२०-२०२१ व २०२१-२०२२ च्या तुलनेने जास्त दिसून येते. कारण २०२०-२०२१ व २०२१-२०२२ (कोरोना कालावधीमध्ये) अहवाल गोळा करण्याची प्रणाली अद्ययावत नव्हती.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) सन २०२५ मध्ये पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील आर.एम.सी. प्लांट व स्टोन क्रशन यांना एकूण ३१ प्रस्तावित निर्देश, २ अंतरीम निर्देश व १२ प्लांटला बंदचे आदेश बजावण्यात आले आहेत.

सन २०२५ मध्ये पुणे मनपा हद्दीतील आर.एम.सी व स्टोन क्रशर यांना प्रस्तावित निर्देश-१८, अंतरीम निर्देश-०१ व १७ प्लांटला बंदचे आदेश बजावण्यात आले आहेत. ०३ उद्योगांना तहसिलदारामार्फत सिल करण्यत आले आहे.

सन २०२५ मध्ये मनपा हद्द वगळुन आर.एम.सी व स्टोन क्रशर यांना एकूण ०९ प्रस्तावित निर्देश, व १३ प्लांटला बंदचे आदेश बजावण्यात आले आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दि.०५/१२/२०२५ च्या पत्रान्वये १० आर.एम.सी.प्लांट्स बंद केल्याचे कळविण्यात आले आहे.

हिंजवडी आयटी पार्क परिसरातील हवा प्रदूषणाबाबत आरएमसी प्लांटची पाहणी करुन कारवाई करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंधेरी, जोगेश्वरी ते दहिसर, मागाठाणे (मुंबई) या परिसरात महानगर टेलीफोन निगम लि. (MTNL) च्या केबल वायर्स अनधिकृतपणे काढून केलेला गैरव्यवहार

**(३५) * २८१२० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पश्चिम उपनगरामधील अंधेरी, जोगेश्वरी ते दहिसर, मागाठाणे या परिसरात रात्रीच्या वेळी अज्ञात इसमाच्या टोळीकडून, जेसीबीच्या सहाय्याने मुंबई महानगरपालिकेच्या रस्त्याखालून गेलेल्या महानगर टेलीफोन निगम लि. (MTNL) च्या केबल वायर्स रस्ता खोदून, अनधिकृतपणे काढण्यात येऊन त्याची विक्री करुन कोटयवधी रुपयाचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी ओशिवरा, वर्सोवा, चारकोप आणि दहिसर पोलीस ठाण्यात दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी ओशीवरा पोलीस ठाण्यात १० ते १२ व्यक्तीवर या संदर्भात गुन्हे दाखल झाले असून १५-२० व्यक्ती फरार दाखविण्यात आले असल्याने या केबल चोरीच्या रॅकेटमध्ये राजकीय व्यक्तींचा सहभाग असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील ओशिवरा, वर्सोवा, चारकोप आणि दहिसर पोलीस ठाणे, मुंबई इत्यादी पोलीस ठाणेत माहे डिसेंबर-२०२५ मध्ये अज्ञात इसमाच्या टोळीकडून, जेसीबीच्या सहाय्याने मुंबई महानगरपालिकेच्या रस्त्याखालून गेलेल्या महानगर टेलिफोन निगम लि. (MTNL) च्या केबल वायर्स रस्ता खोदून, अनधिकृतपणे काढण्यात येऊन त्याची विक्री करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी गुन्हा नोंद नाही. परंतु, सन २०२३ ते २०२५ या कालावधीत संपुर्ण बृहन्मुंबई क्षेत्रातील MTNL ची केबल चोरीबाबत केलेली कारवाईची सांख्यिकी माहिती पुढील प्रमाणे:-

MTNL केबल चोरीप्रकरणी सन २०२३ मध्ये ७ गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी ५ गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यामध्ये १९ व्यक्तींना अटक केलेली आहे. त्यात ८,३३,६९० इतक्या रकमेची मालमत्ता चोरीस गेलेली असून त्यापैकी ६,२१,४०० इतकी रकमेची मालमत्ता हस्तगत केली आहे.

सन २०२४ मध्ये १९ गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी १३ गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यामध्ये ३० व्यक्तिंना अटक केलेली आहे. त्यात २३,०१,२७८ इतक्या रकमेची मालमत्ता चोरीस गेलेली असून त्यापैकी ११,४९,७०२ इतकी रकमेची मालमत्ता हस्तगत केली आहे.

सन २०२५ मध्ये २६ गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी १६ गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यामध्ये ५८ व्यक्तिंना अटक केलेली आहे. त्यात १,१३,५८,७३२ इतक्या रकमेची मालमत्ता चोरीस गेलेली असून त्यापैकी १,१७,३३,०२८ इतकी रकमेची मालमत्ता हस्तगत केली आहे.

महानगर टेलिफोन निगम लि. (MTNL) च्या केबल वायर्स चोरीच्या संदर्भाने ओशिवरा पोलीस ठाण्यात १० ते १२ व्यक्तींवर गुन्हा नोंद असलेबाबत, त्या गुन्हयात १५-२० व्यक्ती फरार दाखविण्यात आलेबाबत तसेच, केबल चोरीच्या रॅकेटमध्ये राजकीय व्यक्तींचा सहभाग असल्याबाबत गुन्हा नोंद नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कवडास (ता.डहाणू, जि.पालघर) येथील उदंचन केंद्रासाठी उभारण्यात येत असलेल्या विद्युत वहिनींचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३६) * २९०९६ श्री.राजन नाईक (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कवडास (ता.डहाणू, जि.पालघर) येथील उदंचन केंद्राच्या (Pumping station) उभारणीसाठी शासनाने अंदाजे रुपये २ हजार कोटी इतका खर्च करूनही परीसरातील महानगरपालिकांना आजतागायत पुरेशा प्रमाणात पाण्याची उपलब्धता होत नसल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू उदंचन केंद्रातील पाणी उपसण्याची क्षमता ही कमी असल्यामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाकडून या केंद्रासाठी नविन १३२ के.वी क्षमतेची विद्युत वाहिनी उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विद्युत वाहिनी उभारताना रेंज लाईन कॉरिडोरमध्ये येत असलेल्या कासा रेंज, डहाणू रेंज आणि सावा रेंज मधील वृक्षांचे मुद्रांकन, वृक्ष मुल्यांकन आणि तोडणी ही कामे संथगतीने सुरु असल्याची बाब निदर्शनास आली आहे. हे ही खरे आहे काय,

(४) त्याचप्रमाणे पालघर कृषी विभागाकडून कॉरिडोरमध्ये येणाऱ्या फळ झाडांचे मुल्यांकन देखील मागील अनेक महिन्यांपासून प्रलंबित असून, कॉरिडोरमध्ये येत असलेल्या जमिनींचे वाद मिटविण्यासाठी स्थानिक पोलीस प्रशासनाकडून योग्य ते सहकार्य मिळत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू नवीन विद्युत वाहिनी उभारण्यासाठी वन विभाग, कृषी विभाग, महसूल विभाग, भूमिअभिलेख तसेच पोलीस प्रशासन यांचा समन्वय आवश्यक असून याबाबत महापारेषणला येत असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी व विद्युत वाहिनीचे काम लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) कवडास, ता.डहाणू, जि.पालघर येथील उदंचन केंद्र ३३ के.व्ही. वाहिनीद्वारे कार्यान्वित करण्यात आले आहे. तथापि पूर्ण क्षमतेने पाणी उपसणे शक्य होत नसल्याने डहाणू उपकेंद्रातुन १३२ के.व्ही. डहाणू ते सुर्यानगर-कवडास वाहिनी उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर काम प्रगतीपथावर असून माहे जून, २०२६ पर्यंत ही वाहिनी कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.
(३) सदर वाहिनी ही वन विभागाच्या डहाणू, कासा व सावा या वन क्षेत्रातून उभारली जात आहे. डहाणू व सावा वन क्षेत्रातील झाडे तोडणीचे काम प्रगतीपथावर असून कासा क्षेत्रातील झाडांवर शिक्का मारणे (Tree Stamping) तथा झाडांचे मुल्यांकन व झाडे तोडण्याच्या परवानगीचे काम विभागीय वन अधिकारी यांच्या मार्फत सुरू आहे. सदर कामे माहे मे, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(४) कॉरिडोरमध्ये येत असलेल्या जमिनीचे वाद मिटविण्यासाठी पोलीस अधिक्षक, पालघर यांच्या मार्फत योग्य ते सहकार्य मिळत आहे.
(५) जिल्हाधिकारी, पालघर यांच्याद्वारे आयोजित बैठकांमध्ये सदर वाहिनीचे काम लवकर पूर्ण करण्यासाठी महसुल, वन व कृषी विभाग तसेच पोलीस प्रशासन यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच या विभागांकडून योग्य ते सहकार्य मिळत आहे. CRZ (Costal regulation zone) क्षेत्रातील कामाबाबत मा.उच्च न्यायालयाची अंतिम परवानगी व संबंधित विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर १३२ के.व्ही. डहाणू ते सुर्यानगर-कवडास वाहिनीचे काम पूर्ण करून वाहिनी कार्यान्वित करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरामध्ये वीज पुरवठा वारंवार खंडीत होत असल्याबाबत

**(३७) * २९१६९ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरामध्ये मागील काही दिवसांपासून वीज पुरवठा वारंवार खंडीत होत असल्याने माहिती तंत्रज्ञानाचे मुख्य केंद्र (IT HUB) असलेले हिंजवडी, वाकड, थेरगाव, शाहूनगर, पिंपरी-चिंचवड, भोसरी सह अनेक भागातील औद्योगिक कंपन्या, व्यावसायिक आस्थापना व नागरिकांच्या रोजच्या व्यवहारात अडचणी निर्माण होत असून उद्योग क्षेत्रात मोठे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरणच्या जुन्या झालेल्या विद्युत वाहिन्या, वेळेवर न होणारी देखभाल-दुरुस्ती व एकाच फिडरवर जास्त ठिकाणचा अतिरिक्त भार टाकल्यामुळे वारंवार वीजेतील यंत्रामध्ये बिघाड होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे शहरातील वाढते नागरीकरण आणि उद्योगधंद्याचे वाढत्या मागणीच्या तुलनेत आवश्यक नव्या वाहिनी व फीडर जोड, नवीन ट्रान्सफार्मर व खंडित वीज पुरवठ्याच्या समस्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन यांच्या वतीने महावितरण विभागाकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, औद्योगिक वीज ग्राहकांना विज देयके भरण्यासाठी हप्ता योजना, मध्यप्रदेशच्या धर्तीवर समाधान योजना, वीज देयकावरील विलंब शुल्क, दंडात सवलत व अभय योजनेच्या अटींमध्ये शिथिलता देण्याकरिता तसेच महिला उद्योजकांसाठी अनुदान योजना व उद्योग तक्रार निवारण केंद्राची उभारणी करण्याबाबतची मागणी फोरम ऑफ स्कूल स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन यांच्यावतीने करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनच्या वतीने करण्यात आलेल्या न्यायिक मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तथापि, महापारेषण कंपनीच्या २२० केव्ही भोसरी अतिउच्चदाब उपकेंद्रातील ८० एमव्हीए क्षमतेचे अतिउच्चदाब रोहित्र दि.०२ फेब्रुवारी २०२६ रोजी तसेच दि.१५ फेब्रुवारी, २०२६ रोजी नादुरुस्त झाले होते व ते महापारेषण कंपनीतर्फे बदलण्यात आले. यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि भोसरी विधानसभा हद्दीतील वीज पुरवठ्यावर काही काळासाठी खंडित झाला होता.
(२) हे खरे नाही.

पिंपरी-चिंचवड औद्योगिक क्षेत्रात महावितरण कंपनीचे कर्मचारी व सूचिबध्द कंत्राटदारामार्फत वीज वाहिन्यांची नियमितपणे देखभाल व दुरुस्ती केली जाते. तसेच उपकेंद्रांचे विविध योजनांद्वारे सक्षमीकरण व बळकटीकरण करणे सुरु आहे.
(३) व (४) फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीयल असोसिअशन यांचे दि.२७.०१.२०२६ रोजीचे निवेदन महावितरण कंपणीस प्राप्त झाले असून, सदर निवेदनानुसार सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना आर्थिक अडचणीमुळे हफ्त्यामध्ये बिल भरण्याची सुविधा, विलंब शुल्कात सवलत तसेच अभय / Amnesty योजना लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे.
(५) वीज देयकावरील विलंब शुल्क व दंड हे मा.वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार लावण्यात येतात. तसेच वीज देयक भरण्यासाठी मा. वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार ठराविक कालावधी दिला जातो. महावितरण कंपनीमार्फत अभय योजना-२०२४ ही दि.०१ सप्टेंबर, २०२४ ते दि.३१ मार्च, २०२५ पर्यंत कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेल्या वीज ग्राहकांसाठी राबविण्यात आली होती.

तसेच, महावितरण कंपनीमार्फत वीजवितरण यंत्रणा सक्षम व बळकट करण्यासाठी मोशी सफारी पार्क आणि प्राईट वर्ल्ड सिटी च-होली येथे नवीन २२०/३३/२२ केव्ही, २०० एमव्हीए क्षमतेचे अतिउच्चदाब उपकेंद्र उभारण्याचा प्रस्ताव महावितरणकडून महापारेषण कंपनीस सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार महापारेषण कंपनीतर्फे सदर प्रस्तावाचे नियोजन २०२६-२७ वर्षाच्या (STU Plan) आराखड्यात समाविष्ट करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेचे एस विभाग कार्यालयाचे सहायक आयुक्त यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(३८) * २८१२२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेचे एस विभाग कार्यालयाचे सहायक आयुक्त, श्री.महेश पाटील यांनी वांद्रे येथील एका पुनर्विकास प्रकल्पात भविष्यात फायदा होईल असे प्रलोभन दाखवून पोलीस अधिकारी, महानगरपालिका अधिकारी आणि अभिनेते यांना गुंतवणूक करण्यास भाग पाडून त्यांचेकडील सुमारे ८० कोटी इतकी रक्कम घेतल्याचा आरोप व्यावसायिक, श्री.निशित पटेल यांनी केला असल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी तक्रार प्राप्त होताच मुंबई महानगरपालिका आयुक्त यांनी श्री.महेश पाटील यास एक महिन्याच्या सक्तीच्या रजेवर पाठविले तसेच त्यांनी खाजगी सुरक्षा रक्षकाच्या मदतीने सदर प्रकरण उघडकीस येऊ नये म्हणून श्री.निशित पटेल यांना मारहाण करुन धमकी दिली असल्याची ध्वनीचित्रफित देखील प्रसारित केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधिताविरुद्ध कारवाई करण्यासह गुंतवणुकदारांची फसवणूक करुन घेतलेली रक्कम परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) तक्रारदार यांनी त्यांना दिनांक ०४/१०/२०२५ रोजी महेश पाटील उर्फ मकरंद दगडखैर सहायक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, प्रसाद खैरनार, सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग, स्वाती वरूटे, महिला पोलीस शिपाई, विशेष शाखा, अली रजा भागीदार, शिशा रेस्टॉरंट बांद्रा, २ अनोळखी बाउन्सर यांच्याकडून मारहाण झाल्याबाबतचा आरोप दि.०४.११.२०२५ रोजीच्या तक्रार अर्जाव्दारे केला आहे. सदर अर्जात रु.६० कोटीची खंडणी मागितल्याबाबत तक्रारदाराने नमुद केले आहे, ही वस्तूस्थिती आहे.
(२) नगर विकास विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार श्री. महेश पाटील, सहायक आयुक्त यांना रजेवर पाठविण्यात आले होते. तद्नंतर कार्यालयीन आदेशान्वये त्यांची सहायक आयुक्त, रुग्णालये म्हणून बदलीने पदस्थापना करण्यात आली होती. सद्यःस्थितीत कार्यालयीन आदेशान्वये श्री. महेश पाटील हे सहाय्यक आयुक्त (के/उत्तर) विभाग म्हणून कार्यरत आहेत.

तसेच निशित पटेल यांना खाजगी सुरक्षा रक्षकाद्वारे मारहाण केल्याची/धमकीची ध्वनीचित्रफित प्रसारित केल्याची बाब निदर्शनास आली आहे.
(३) व (४) अर्जदार यानी दिलेल्या तक्रारी नुसार त्यांचेकडे ६० कोटी रूपये खंडणी मागीतले बाबत त्यांनी कोणताही पुरावा सादर केलेला नाही. तसेच गुंतवणूकदारांची फसवणूक करून घेतलेली रक्कम परत करण्याच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत कोणी व्यावसायिक, शासकीय अधिकारी यांनी पोलीस प्रशासनास संपर्क केलेला नाही किंवा ०१/१२/२०२५, तशा मजकूराचा कोणताही तक्रार अर्ज चौकशीस प्राप्त नाही. अर्जदार यांना त्यांच्या, तक्रार अर्जाचे अनुषंगाने पोलीस स्टेशन मध्ये दिनांक २९/११/२०२५, ०२/१२/२०२५, ०५/१२/२०२५, ०९/०१/२०२६ रोजी हजर राहणेबाबत सांगितले असता ते हजर राहिले नाहीत. त्याची नोंद रोजनाम्यामध्ये घेण्यात आली आहे. अर्जदार चौकशीस सहकार्य करत नसुन, त्यांनी अधिक चौकशी करता प्रमाणीत व योग्य दस्तऐवज सादर न केल्याने योग्य तो निष्कर्ष काढण्यात अडचण येत आहेत. तसेच अर्जदारामध्ये चौकशी करीता उदासिनता असल्याचे दिसुन येत आहे.

अर्जदार यांनी त्यांना दि.०४/१०/२०२५ रोजी झालेल्या मारहाणीचे अनुषंगाने कोणतेही प्रमाणित कागदपत्रे उपलब्ध करून दिलेली नाहीत. त्यानुषंगाने डॉ. भाभा हॉस्पिटल, बांद्रा येथील वैद्यकीय अधिकारी यांचेकडून प्राप्त प्रमाणपत्रानुसार अर्जदार यांनी दि. ११/११/२०२५ रोजी वैद्यकीय उपचार घेतल्याचे दिसते. त्यानुषंगाने वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे अधिकची चौकशी सुरू आहे.

अर्जदार यांनी त्यांना दि.०४/१०/२०२५ रोजी झालेल्या मारहाणीच्या अनुषंगाने सुमारे एक महिन्यानंतर दि.११/११/२०२५ रोजी वैद्यकीय तपासणी केली आहे. नमुद घटनेच्या दिवशी अर्जदाराने मारहाणीच्या अनुषंगाने उपचार घेतलेले नाहीत. तसेच प्रत्यक्षदर्शी व इतर साक्षीपुरावे उपलब्ध नसल्याने मारहाणीबद्दल अद्यापपर्यंत निष्कर्षाप्रत पोहचता न आल्याने गैरअर्जदारावर कार्यवाही केली नाही व याबाबत अधिक चौकशी सुरू आहे, असे पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाकडून प्राप्त माहितीवरुन दिसून येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.